मा.यशवंतराव चव्हाण



१०८ व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन!

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

सी-डैक
CDAC

Creating a Knowledge Lit World

HKCL

OKC

MKCL Dubai

MKCL

CL Riyadh

MKCL Malaysia



KCL Lanka

**यशवंतराव चव्हाण**
**राष्ट्रीय पुरस्कार २०२०**
**सुप्रसिद्ध माहिती तंत्रज्ञ श्री.विवेक सावंत**



यशवंतराव
चव्हाण
यशवंतराव चव्हाण यांची ३६ वी पुण्यतिथी
यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०२०
लोकहितवादी मंडळ, नाशिक
मा. शरद पवार

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➢**

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. फ. मु. शिंदे
७. मा. श्री. द. म. सुकथनकर
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१०.मा. श्री. अजित निंबाळकर
११.मा. श्री. बी. के. अग्रवाल
१२.मा. श्री. अमित डहाणूकर
१३.मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४.मा. श्री. ना. धों. महानोर
१५.मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६.मा. श्री. नितीन करीर
अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग
१७.मा. श्री. नितीन जिवणे
विधी सल्लागार, सहसचिव, विधी व न्याय विभाग

**➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➢**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०.मा. श्री. प्रकाश आवाडे
११.मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१२.मा. श्री. जीवनराव गोरे
१३.मा. श्री. विजय शिर्के
१४.मा. श्री. जयराज साळगांवकर
१५.मा. श्री. सचिन मुळे
१६.मा. श्री. राजेश टोपे
१७.मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील
१८.मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
१९.मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२०.मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२१.मा. श्री. नितीन करीर
अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

---

**➢ कार्यकारी समिती ➢**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| | कार्याध्यक्ष | श्री. विश्वास ठाकूर |
| विभागीय केंद्र, कोकण | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | - |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | - |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | श्री. विलास पानखडे |
| जिल्हा केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |
| जिल्हा केंद्र, उस्मानाबाद | अध्यक्ष | श्री. जीवनराव गोरे |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |
| यशवंतराव चव्हाण जन्मस्थळ, देवराष्ट्रे | समन्वयक | श्री. प्रदीप मोहिते |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक, सभागृहे | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई चार्टर्ड अकाउंटंट |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | घोरपडे मराठे ॲण्ड असोसिएट्स, मुंबई, चार्टर्ड अकाउंटंट |

# संपादकीय

**आपला समाज, आपली जबाबदारी**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या १०८ व्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.गेले एक वर्ष संपूर्ण जग कोरोना साथीच्या आजाराने ग्रासले आहे. जगात सर्वत्र लॉकडाऊनमुळे सगळे व्यवहार थांबून अनेक महिने पूर्णपणे बंद होते. ८-९ महिन्यानंतर हळूहळू जनजीवन सुरळीत व्हायला लागले. मात्र अनेक ठिकाणी पुन्हा कोरोनाची दुसरी लाट आल्यामुळे पुन्हा लॉकडाऊन करावे लागले. आता कोरोनावरील लस आली आहे. लसीकरणाचा कार्यक्रम सर्वत्र सुरू आहे आणि त्याचबरोबर कोरोनासह जगण्याचे प्रयोगही आपण सर्व करत आहोत. या स्थितीला सध्या 'न्यू नॉर्मल' असे म्हटले जात आहे.

या सगळ्याचा वैश्विक अर्थव्यस्थेला मोठा फटका बसला. भारत देश आणि महाराष्ट्र यांच्याही अर्थव्यवस्था खूपच अडचणीत आहेत. त्यावर मात करण्याचे प्रयत्न विविध मार्गांनी सुरू आहेत. मात्र महाराष्ट्र सरकारने आणि विशेषतः आरोग्य विभाग व त्या विभागाचे मंत्री मा. राजेशभैया टोपे यांनी स्वतः पुढे राहून कोरोनाचा सामना केला. मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. गृहमंत्री, मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनीही परिस्थिती जबाबदारीने व धाडसाने पार पाडली. आरोग्य विभागाचे डॉक्टर्स, नर्सेस व इतर कर्मचारी सफाई कर्मचारी, गृह विभागाचे पोलीस व अधिकारी आणि महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्था, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जिवाची बाजी लावून या आजाराचा मुकाबला केला व त्यामुळे कमीतकमी नुकसान झाले. त्यांना कृतज्ञतापूर्वक सलाम!

प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, आणि विभागीय केंद्राचे पदाधिकारी यांनी आपापल्या विभागात लोकांना आरोग्यविषयक उपचार मिळवून देण्यासाठी व अन्नधान्याची व्यवस्था करण्यासाठी भरपूर मेहनत घेतली. त्याचीही नोंद करणे आवश्यक आहे. तसेच या कालावधीत अनेक विभागांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्याख्याने, चर्चासत्रे, बैठकांचे आयोजन केले. विशेषतः शिक्षण विकास मंचाने देशोदेशींच्या शिक्षणपद्धतींविषयी शिक्षक व पालकांना माहिती करून दिली व आपल्या राज्यातील शैक्षणिक परिस्थितीत ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने सहभागी झाला. जानेवारी २०२१ मध्ये प्रतिष्ठानचे दिवंगत विश्वस्त उपाध्यक्ष मा. अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त स्मृतीसभेचे आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठानच्या युवा

विभागाच्यावतीने देण्यात येणारे सामाजिक व क्रीडा क्षेत्रांतील पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. त्याची महिती वार्तापत्रात दिली आहे.

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०२० चे मानकरी यावर्षी महाराष्ट्राचे सुपुत्र मा. विवेक सावंत हे ठरले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांतील त्यांच्या मौलिक कामगिरीसाठी त्यांचा हा बहुमान होत आहे त्यांच्या सन्मानपत्रात त्यांच्या कार्याची विस्तृत माहिती आपणांस पाहता येईल. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन..!

गेल्या अनेक वर्षांपासून मी भारतीय संविधान विषयक जागृती प्रबोधनाचे उपक्रम करण्याचे योजिले होते. प्रतिष्ठानच्या संस्थापक पिढीने खरे तर त्याची सुरुवात केली होती. आम्ही पुन्हा एकदा गेले काही महिने त्या दिशेने विचारविनिमय कार्याला सुरुवात केली आहे. त्याचीही नोंद वार्तापत्रात घेतली आहे.

सध्या चव्हाण सेन्टरच्या इमारतीचे दुरुस्तीचे काम सुरू आहे. तरीही नियमित कामकाज सुरूच आहे. येत्या काही महिन्यातच नव्या रंग-रूपात चव्हाण सेंटरचे दर्शन आपणा सर्वांना होईल. कोरोनाची भीती संपून नव्या, निर्मळ, उत्साही वातावरणात भेटण्याच्या प्रतीक्षेत...

(सुप्रिया सुळे)
कार्याध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,
मुंबई

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०८ व्या जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन
वर्ष : २४वे / अंक ४९वा / प्रकाशन : १२ मार्च २०२१

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष साहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

साहाय्य
**मीनल सावंत-पाडावे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रूपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, अशोक जाधव, मंगेश शिंदे, शशांक आंबेरकर, विलास परदेशी, भक्ती जांभवडेकर, स्वाती शेलार, विप्लव वागडे, अतुल तांडेल यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण यांचा लेख ........ ६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मानपत्र.. ........ ८

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ........ १०
- शिक्षण विकास मंच ........ १८
- अपंग हक्क विकास मंच ........ २४
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........ २५
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........ २९

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, नाशिक ........ ३०
- विभागीय केंद्र, ठाणे ........ ३१
- विभागीय केंद्र, नवी मुंबई ........ ३१
- विभागीय केंद्र, उस्मानाबाद ........ ३३
- विभागीय केंद्र, कराड ........ ३५
- विभागीय केंद्र, जळगांव ........ ३६
- विभागीय केंद्र, नवी मुंबई ........ ४३
- विभागीय केंद्र, कराड ........ ३५
- विभागीय केंद्र, जळगाव ........ ३६
- विभागीय केंद्र, देवराष्ट्रे ........ ३८
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ........ ३८
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........ ३९
- विभागीय केंद्र, नागपूर ........ ४१
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ........ ४२
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ........ ४४
- विभागीय केंद्र, नांदेड ........ ४४
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर ........ ४५
- यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर.. ४६
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........ ४७

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# विधायक कर्तृत्वास आव्हान

नव्या महाराष्ट्र राज्यासमोर असलेल्या आर्थिक, सामजिक आणि इतर समस्यांची चर्चा करण्याकरता हा परिसंवाद घडवून आणल्याबद्दल 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' व 'साधना साप्ताहिक' यांचें मी अभिनंदन करतों.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी, मराठी भाषिक जनतेनें राजकीय क्षेत्रांत दीर्घकाळपर्यंत उराशी बाळगलेली एक आकांक्षा फलद्रूप झाली आहे. मराठी भाषिक प्रदेशांत सर्वत्र जे उत्स्फूर्त उत्सवसमारंभ साजरे झाले त्यावरून समाजाच्या सर्व थरांतील लोकांनीं या राज्याचें किती उत्साहानें स्वागत केलें आहे तें दिसून आलें. महाराष्ट्रांत राहणाऱ्या पण मराठी मातृभाषा नसलेल्या लोकांनींहि या नव्या राज्याचें तितक्याच उत्साहानें स्वागत केलें आहे. हे आनंदोत्सव व समारंभ-सोहळे आतां संपले असून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेबरोबर आलेल्या महत्त्वाच्या समस्यांचा विचार आपल्याला आतां करावयास पाहिजे.

माझ्यापुरतें बोलावयाचे झालें तर मला असें सांगावेंसें वाटतें की, नव्या महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेमुळे मराठी भाषिक जनतेची एक दीर्घकालीन आकांक्षाच फलद्रूप झाली आहे एवढेंच नाहीं, तर महाराष्ट्र राज्यांतील लोकांच्या मुत्सद्देगिरीस व विधायक विचारास त्यामुळें एक महान संधि उपलब्ध झाली आहे; नव्हें - एक प्रकारें आव्हानच दिलें गेलें आहे.

खरोखर सर्व वर्गांच्या व सर्व थरांतील लोकांना हें एक आव्हानच आहे. शेतकरी व शेतमजूर, उद्योगपति व औद्योगिक कामगार, व्यावसायिक व बुद्धिजीवी वर्ग, व्यापारी व श्रमजीवी समाज या सर्वानाच हें आव्हान आहे. वस्तुतः ज्यांना व्यावसायिक किंवा बुद्धिजीवी वर्ग म्हणून ओळखलें जातें त्यांच्यावर तर या बाबतींत विशेष जबाबदारी आहे. सार्वजनिक धोरणासंबंधींच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांबाबत नेतृत्व करणें हा त्यांचा अधिकार आहे, तें त्यांचें कर्तव्यच आहे. समाजांतील इतर लोकांना शिक्षण व अनुभव यांचा जो फायदा मिळाला नाहीं तो त्यांना मिळाला आहे. तेव्हां बुद्धिजीवी वर्गानें पुढाकार घेऊन आज आपल्यासमोर जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांची सांगोपांग चर्चा केली पाहिजे, त्यासंबंधी विशिष्ट दृष्टिकोन बनविले पाहिजित आणि जनमत तयार केलें पाहिजे.

महाराष्ट्र राज्यामध्ये आम्ही जें काम करणार आहोंत त्याची दिशा अगदी स्पष्ट आहे. राष्ट्रीय ऐक्यास पोषक होईल अशा तऱ्हेनेंच आपणांस महाराष्ट्र राज्यांतील सर्व वर्गांचा विकास व उन्नति घडवून आणावयाची आहे. सामाजिक एकात्मतेच्या बाबतींत आपले कांही खास प्रश्न असून ते सोडविण्यासाठी आपण योग्य ते उपाय शोधून काढले पाहिजेत. नव्या राज्यामधले कांही प्रदेश आर्थिक दृष्ट्या अविकसित व मागासलेले आहेत. स्वाभाविकपणेंच त्यांचा विकास ही महाराष्ट्र सरकारच्या दृष्टीनें खास विचाराची बाब आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विभागांव्यतिरिक्त, राज्यांतील कांहीं वर्गहि मागासलेले आहेत. त्यांच्या प्रगतीसाठी सुद्धा आपणांस विशेष प्रयत्न केले पाहिजेत. या मागासलेल्या वर्गात केवळ सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांचाच नव्हे तर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांचाहि मी समावेश करतों. समान संधि ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेंतील महत्त्वाची बाब आहे. आणि म्हणून बुद्धि असूनहि केवळ पैशाच्या अभावामुळे तिला वाव मिळत नाहीं असें होतां कामा नये. महाराष्ट्रात अशा प्रकारें सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळेल अशी परिस्थिति निर्माण करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे.

सामाजिक एकात्मतेचा हा एक प्रश्न झाला. त्याशिवाय महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढे आहे. मुंबई विभाग हा देशामध्यें उद्योगधंद्यांच्या बाबतीत आघाडीवर असल्यामुळें, भारतीय संघराज्यांतील औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याची गणना होते. साहजिकच नव्या नव्या औद्योगिक उपक्रमांना चालना देऊन लोकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून देणें हें या नव्या राज्याच्या धोरणांचे एक महत्त्वाचें अंग राहील. नवीन औद्योगिक उपक्रम सुरू करण्याच्या बाबतींत आपल्याला पुष्कळच गोष्टींची अनुकूलता असल्याकारणानें उद्योगधंद्यांची वाढ करण्याचा आणि तीसुद्धा द्रुतगतीनें करण्याचा आमचा निर्धार आहे. म्हणून चालू उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आणि नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठी सर्व प्रकारच्या आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देणें हें या राज्याचें महत्त्वाचें कार्य राहील. पाणीपुरवठा, दळणवळणाची साधनें इत्यादि सोयी त्वरित मिळूं शकतील अशा ठिकाणीं नवीन उद्योगधंद्यांसाठी औद्योगिक वसाहती व औद्योगिक विभाग स्थापन करण्याचा आमचा मानस आहे. विद्युतशक्तीची वाढ करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न होत आहेत.

ऑक्टोबर १९६१ मध्यें कोयनेची वीज मिळण्यास प्रारंभ होईल असा अंदाज आहे. त्यानंतर ठराविक टप्प्यांनीं या योजनेंतून आणखी वीजपुरवठा होत राहील. त्यामुळें विजेच्या बाबतींत या भागांतल्या परिस्थितीत पुष्कळच सुधारणा होईल. उद्योगधंदे व त्यांतून निर्माण होणारा रोजगार यांची वाढ करीत असतांना सामाजिक न्यायाकडे आपणांस दुर्लक्ष करतां येणार नाहीं. विकास व सामाजिक न्याय या गोष्टी परस्परविरोधी नाहींत. उद्योगधंद्यांची वाढ व कामगारांना न्याय या दोन्ही गोष्टी बरोबरच साध्य होऊं शकतात, नव्हे साध्य झाल्या पाहिजेत. एका बाजूनें उद्योगपतींनी खऱ्या अर्थानें आपल्या धंद्यांत भागीदार असलेल्या कामगारांचे न्याय्य हक्क मान्य केले पाहिजेत आणि दुसऱ्या बाजूनें औद्योगिक कामगारांनी शिस्तीचें महत्त्व ओळखलें पाहिजे, व उत्पादनक्षमता व वेतनाचे प्रमाण यांमधील अपरिहार्य असलेले संबंध ध्यानांत घेतले पाहिजेत. आपल्या राज्यांत औद्योगिक संधि घडवून आणण्याची नितांत आवश्यकता असून त्यासंबंधी अलीकडे मी अनेकवार बोललों असल्याचें आपणां सर्वांना विदित आहेच. अशा प्रकारच्या संधीचा तपशील ठरविण्यासाठी व त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था करण्यासाठी पुष्कळच विचारविनिमय करावा लागेल. परंतु यामागील हेतु मात्र अगदीं स्पष्ट आहे व तो म्हणजे औद्योगिक वाढ व उत्पादनक्षमता यांचा सामाजिक न्यायाशी मेळ घालणें हा होय. या कल्पनेला आकार व मूर्त स्वरूप देण्याच्या कामी, आपल्या परिसंवादांत जी माहिती उपलब्ध होईल व जे विचार पुढें येतील त्यांचें बहुमोल साहाय्य होणार आहे.

> एका बाजूनें उद्योगपतींनी खऱ्या अर्थानें आपल्या धंद्यांत भागीदार असलेल्या कामगारांचे न्याय्य हक्क मान्य केले पाहिजेत आणि दुसऱ्या बाजूनें औद्योगिक कामगारांनी शिस्तीचें महत्त्व ओळखलें पाहिजे, व उत्पादनक्षमता व वेतनाचे प्रमाण यांमधील अपरिहार्य असलेले संबंध ध्यानांत घेतले पाहिजेत.

उद्योगधंद्यांबरोबरच शेतीचा प्रश्नहि आपल्यासमोर प्रामुख्यानें आहे. कारण देशांतील इतर भागांप्रमाणें आपल्या राज्यांतहि शेतीचें क्षेत्र विस्तीर्ण असून लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीच्या क्षेत्रातील अनेक प्रश्न आपणांस सोडवावयाचे आहेत. शक्य असेल तेथें पाटबंधारे बांधून व इतर ठिकाणी जमिनीतील ओल टिकवून धरून, जमिनीस हमखास पाणीपुरवठा उपलब्ध करून देणें हा एक प्रश्न आहे. या दृष्टीनें आम्हीं पाटबंधाऱ्यांच्या मोठमोठ्या योजना हातीं घेतल्या असून अशाच प्रकारच्या आणखी अनेक योजना हातीं घेण्याचा आमचा विचार आहे. बांधबंदिस्ताची व भूसंरक्षणाची अनेक कामें महाराष्ट्र राज्याच्या कांहीं विभागांत मोठ्या प्रमाणावर सुरू असून इतर विभगांतहि तीं सुरू व्हावयास पाहिजेत. याबरोबरच सुधारलेल्या जातींचें बी-बीयाणें पुरविणे, रासायनिक खतें, शेतीच्या सुधारलेल्या पद्धति इत्यादि बाबतींतील संशोधनाचे निष्कर्ष शेतकऱ्यांपर्यंत पोंचविणें, यांसारख्या अनेक गोष्टी शेतीच्या उत्पादनवाढीच्या प्रश्नांशी निगडित आहेत. देशांतील इतर भागांप्रमाणेंच आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेंतहि शेतीला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे हें आपण जाणतांच.

शासनयंत्रणेबाबत जे अनेक प्रश्न आहेत त्यांच्यासंबंधी येथें सविस्तर चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. गेल्या कांहीं दिवसांत मीं अनेकदां सांगितलें आहे की, उत्तम व चोख अशी शासनयंत्रणा निर्माण करणें हें महाराष्ट्र राज्यापुढील एक महत्त्वाचें उद्दिष्ट आहे. या बाबतीत पूर्वीच्या मुंबई राज्यांतील कांहीं उत्तम परंपरांचा वारसा आपणांकडे आला आहे. त्या परंपरा तशाच पुढें चालू ठेवण्याचा व शक्य झाल्यास त्यांत भर घालण्याचा आमचा निर्धार आहे. शासनयंत्रणेंतील कार्यक्षमता व सचोटी अबाधित राखून स्थानिक कर्तृत्वाला व उपक्रमशीलतेला जास्तीत जास्त उत्तेजन देण्याचा सरकारचा विचार आहे. ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांची वाढ करणें, सत्ता व अधिकार यांचें वाढत्या गतीनें विकेंद्रीकरण करणें या गोष्टींकडेहि सरकार सदैव लक्ष पुरवील. शासनाची कार्यक्षमता कायम ठेवून स्थानिक कर्तृत्व व उपक्रमशीलता यांस चालना देण्याच्या दृष्टीनें योजना तयार करण्याच्या कामीहि आपल्या या परिसंवादाची बरीच मदत होईल अशी मी अपेक्षा करतों.❖

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2020 FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

## CITATION

Shri Vivek Sawant, who is former Managing Director of Maharashtra Knowledge Corporation Limited, hails from Konkan. He was born on 26th October 1958 in Mumbai. However, his grandfathers - both maternal and paternal, were settled in Konkan. His maternal grandfather, Shri Shankarrao Dajiba More belonged to Harne-Murud, the village to which Bharat Ratna Maharshi Dhondo Keshav Karve belonged. Shri More was a renowned sculptor, interior designer, decorator and mural artist. He engraved the letters **'हे राम'** on the Samadhi of Mahatma Gandhi at Rajghat, Delhi.

Vivek's paternal grandfather was Laxman Hari Sawant. He shifted his base from Ratnagiri to Nashik where he established new high school, which was dedicated to national education. He was a follower of Mahatma Gandhi who believed in simple living and high thinking. The then Chief Minister, Shri Yashwantrao Chavan had given land in Nashik at a nominal price for the high school and he also inaugurated the building of the high school. Shri Sawant was honoured as ideal teacher on the national level. Vivek Sawant's father was associated with Kushthadham — an institute dedicated to treatment and rehabilitation of leprosy patients. Vivek's mother had started a school called 'Shishu Vihar' where she worked on honorary basis. One can see the imprint of high values of his father and grandfathers in the life and work of Shri Vivek Sawant.

After completing his school and college education in Nashik and post-graduation in Pune, Vivek served as a teacher of physics, electronics and computer science at the Ferguson College, Pune from 1979 to 1987. In 1988 he started working in C-DAC, then headed by Dr. Vijay Bhatkar. He worked in C-DAC from 1988 to 2000, where he participated in design and development of India's first indigenous super computer Param. During his tenure at C-DAC, he established the nationwide network of 20 Advanced Computing Training Schools (ACTS). Under his stewardship of ACTSs, more than 25,000 engineering graduates from various disciplines were rigorously trained in software engineering and state-of-art software development tools and methodologies. All of these trainees of ACTS got placements in leading IT industries in India and abroad.

A significant initiative of Shri Sawant has been the IT literacy campaign within the Government of Maharashtra from 1995. It has now taken the form of MKCL and MS-CIT. MKCL has emerged as

a high-tech initiative of the Government of Maharashtra and ten universities for technical education, e-governance and empowerment technologies. It is widely acknowledged as the benchmark in IT literacy and a major step towards bridging the digital divide and resultant knowledge and opportunity divide. In view of his pioneering contribution in e-governance of the PWD, he was invited to be the co-author of the Pradhan Mantri Gram Sadak Yojana under which a nationwide rural road network of 12 lakh kms has been established. He also played a leadership role in computerization of the Maharashtra State Legislature and revolutionized the working of Stamps and Registration Department. In MKCL he has set up a network of about 5,000+ authorized learning centres spanning the length and breadth of Maharashtra. Over 1.25 crore learners have taken the low cost but high quality IT qualification leading to MS-CIT. This venture has provided employment and self-employment opportunities to about 25,000 youngsters at their native places. Today MKCL has emerged as a self-sustaining, wealth creating and ever growing enterprise, which is committed to its social responsibility and social accountability.

Shri Sawant has served on the Board of Studies and Academic Councils of several universities. He is the honorary fellow of the Maharashtra Academy of Sciences. He also serves on the Board of Directors of Odisha Knowledge Corporation, Haryana KCL, MKCL International Free Zone Establishment, Dubai; MKCL Arabia Ltd., Riyadh; MKCL Malaysia, MKCL Lanka, etc. He is a recipient of several awards for his distinguished contribution in the field of IT and computer education. To mention a few, Rotary's Vocational Excellence Award, Rajeev Gandhi Sanganak Sarathi Award, Doordarshan's Shikshan Ratna Award and Pune's Pride Award 2014 for Excellence in Education. Currently he is the Chief Mentor of MKCL.

With his significant and dedicated work in the field of IT literacy, e-governance and education, he has made outstanding contribution to social and economic development of the nation. The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai is pleased to honour his services to the nation by conferring on him the Yashwantrao Chavan National Award 2020.

Mumbai
12th March, 2021

Dr. Anil Kakodkar
Chairman
Panel of Jury

Sharad Pawar
President
Yashwantrao Chavan Pratishthan,
Mumbai

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## विज्ञानगंगा व्याख्यानमाला

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील ५२ वे पुष्प दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी प्रा. सतीश देसाई यांच्या 'रिसर्च ऑन काँक्रीट कन्स्ट्रक्शन' या विषयावर झुम ॲपद्वारे झालेल्या व्याख्यानाच्या रूपात गुंफले गेले.

**Prof.Satish Desai,** who is a London based engineer with a long experience of Design, Planning and Execution on Concrete Constructions, both in India for 8 years and in England for 44 years. Prof. Desai has also worked as Hon. Visiting Professor at the University of Surrey, Kingston, UK and Osmania, Hyderabad, India.

Portland cement was invented in 1824 at UK. Prof. Desai said, in Concrete Construction a good practice must be followed in design, and construction, especially in making and placing concrete with right constituents to make structures durable, safe and serviceable. Engineers should pay attention to protect environment. He said Research means seeking Knowledge. A good concrete construction lasts for 50 years, but the prestigious ones for 100 years. Concrete construction is robust and durable. Concrete releases less Carbon Dioxide in the atmosphere, reduces energy consumption and avoids rapid depletion of natural resources, as against wood used in Western countries. However, manufacturing of Portland cement is described as energy demanding including quarrying lime stones, crushing to get clinkers, burning at high temperature like 1500 degrees Celsius and then grinding to get fine powder. In the production of 1 tonne of Portland cement, one tonne of carbon dioxide gets released. Concrete sustainability can be increased by making a robust design, have proper aggregate binding to reduce cement-sand binder by using recycled aggregate and making it durable and avoiding wastage of premature demolition of faulty structure.

Good engineering practices are required to be adopted in the interest of durability and service life. In the absence of good engineering practices, i.e. untrained engineers, structures fail prematurely. Research should be such that it pays attention to environmental aspect. However, such research must also enable engineers to carry out their primary responsibility to provide safe, durable and serviceable structures based on the applied science of engineering.

✧✧✧✧✧✧✧

### Technology-Engineering : 50 Years Back and 5 Years Ahead in Future

53rd lecture in the series of Vidnyanganga jointly organized by Yashawantrao Chavan Pratishthan, Mumbai and Marathi Vidnyan Parishad was delivered by Dr.Gajanan Sabnis of USA on Friday, 16th October, 2020 at 5 pm through Zoom app. He spoke on 'Technology-Engineering - 50 years back and 5 years ahead in Future.'

Dr.Sabnis studied BE(Civil) in Mumbai, followed by M.Tech in IIT,Powai, followed by PhD in Cornell University, USA. Then he taught Engineering in Harvard University in USA and simultaneously started his own consultancy under the name, KC Engg-PC. He wrote many books in English and Marathi, some on Technical subjects and some through social angle.

During past 50 years, everyone in the society underwent through lot of Technological changes. Example, AT&T telephones to Cell phones, Black and White Television sets to coloured one to Mobile, Logtables to Calculator to Mobile, drawing board and T square to CAD(Computre Aided Design), mailing letters to e-mails and many more.Now due to Corona pandemic, we are unable to meet in person. We have virtual meetings, and Webinars. So, one will question, did it bring together or took us apart? One will say that without travel, we can organize internet meetings, people sitting at their home in different countries. This is a benefit but the pleasure of meeting in person is beyong discription. How did it affect our life? Good or bad? Still, everyone is

house locked, it affects us psycologically and phisically. Were we happier 50 years back? Life was very quite then and now people are running to the tune of clock. People say that industrial life is disturbed in Corona pandemic, but Walt Disney started in the recession in 1923-24, Hewlett Packard Corporation started in the recession in 1938, Microsoft started in the recession of 1975, Cable News Network (CNN) started in the recession of 1980 and FedEx started in the recession of 1973.

Progress in life is not linear.

Air Travel in 1965 from India to USA was in three stages. Now, one can fly directly from India to USA, with larger speed. Speed in all the mode of travel has increased tremendasouly. Technology changed business in last 40 years from mail to Telex to Fax to paperless transmission. Technology helped start up business between the countries and individuals across the ocean transmitting information freely and efficiently.

Lecture was attended by 20 people.

## Beyond Higgs Boson-The Origin of Matter-Dark Matter and the Collider After LHC

In the 54th lecture in the series of Vidnyanganga, Dr. Ashutosh Kotwal of Duke University, USA spoke on 'Beyond Higgs Boson-The Origin of Matter-Dark matter and the Collider after LHC' through Zoom App and Face book on 27th November, 2020. 17 people attended through Zoom app.

Dr.Kotwal said, many countries have participated in Higgs Boson program, including India. A question arises, why there is a matter at all in the universe and is there any Dark matter.Higgs Boson is,'Ado for Nothing'in the language of Shekespeare. We have understood about Nothingness about Vaccum. Vacuum is much different than nothing. It is lack of everything and Higgs Boson has proved it. It is antispace. Higgs Boson exists even in Vaccum and Dark matter also exists everywhere. Higgs is unlike any other fundamental state of nature. It is not a matter, not a force. It is different kind of material. In 20th century, all electronic communication, computers, nuclear power are using Quantum Mechanics. 30 to 40 % of our life is governed by Quantum Mechanics. Insulin is manufactured artificially.

Pauli conference took place in 1927 which discussed mainly on Quantum Mechanics. Paul Dirac did the combination of Quantum Mechanics and Special Relativity. Both are natural.

Electrons are moving everywhere. It is the smallest magnet. When electron moves about itself in 360 degrees, it becomes negative of itself under the complete rotation. Bose solved a major puzzle in Quantum Mechanics by proving particals of the same type of indistinguishable. Pauli Exclusion Principle is identical particals like electrons, protons and nutrons cannot be at the same point in space at the same time. This is fundamental explanation why matter is made of Fermions. Fictitious forces are observed by moving like Hurricane appears by rotating. The force causing this interaction is described by particals.

Dirac predicted electrons (Fermions) as left or right handed. He said, they need not have the interaction for left or right. He got Nobel prize on this work. Since Fermions interacted differently, they must be massless. Mass cannot be a fundamental property. In a crowd, if somebody do not interact with anyone, he can move fast. But one who interacts, cannot move fast. Why we don't feel Higgs? If a stone is thrown in water, it creates ripples. like in Higgs field. Why Higgs Boson is existing? It exists in condensation. We need a similar dynamic explanation for condensation of the Higgs Boson field. New Physics principles are needed for condensation process. Dirac said every matter has antimatter. Like, if we dig a hole in ground, the hip of earth is matter and the hole is antimatter. When a bubble is created from a drop of water, that drop is matter and bubble is antimatter. When the bubble is destroid, there is a vaccum.In the universe, there is more matter than antimatter. So, there is a mistery about the missing antimatter. We need more matter than antimatter for stars, planets etc. Very little antimatter is found in space.

Scientist Sakharav said, three conditions are needed for creating matter in excess. A bigger accelarator than LHC can achieve Sakharav's condition. Higgs is not a matter nor a force. Gravity provides for centripetal

force. Star's orbit speed is too high, too much centripetal force. There is four times dark matter as much is visible.

❖❖❖❖❖❖❖

## हृदयारोपण

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने गेली साडेचार वर्ष चालू असलेल्या व्याख्यानमालेतील ५५ वे पुष्प डॉ. अन्वय मुळे यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजी 'हृदयारोपण' या विषयावर झुम आणि फेसबुक माध्यमांतून गुंफले. झुम माध्यमावर १७ व्यक्ती उपस्थित होत्या. मात्र फेसबुकवर दिनांक २५ डिसेंबरपर्यंत ३६०० लोकांनी ते ऐकले.

''हृदयारोपण हा जुना विषय आहे. त्यात मी काही संशोधन केलेले नाही. जगातले पहिले हृदयारोपण ४७ वर्षांपूर्वी झाले. असे रोपण करणे हे एकट्याचे काम नाही, ते सांघिक आहे. मी जेव्हा हे काम करायचे ठरवले तेव्हा मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून ग्रीन कॉरिडॉरसाठी परवानगी घेतली. शासनाकडून परवाना मिळवला. मी काम करीत होतो त्या फोर्टिज रुग्णालयाची परवानगी घेतली. (आता मी मुंबईच्या गिरगावातील हरकिसनदास-रिलायन्स रुग्णालयात असतो). ग्रीन कॉरिडॉर म्हणजे, जर एखादे हृदय पुण्यात मिळाले तर ते मुंबईत आणण्यासाठी पोलीस बंदोबस्त आणि रस्ता मोकळा करतकरत कमीतकमी वेळेत ते मुंबईत आणणे. ३ ऑगस्ट, २०१५ रोजी मी पहिली हृदयारोपण शस्त्रक्रिया केली. अर्थात ही मुंबईतली होती. त्यापूर्वी दिल्ली, चेन्नई येथे अशा शस्त्रक्रिया झाल्या होत्या. मूत्रपिंड, यकृत बदलण्याच्या शस्त्रक्रिया या जिवंत माणसाकडून ते अवयव घेऊन होतात. पण हृदयारोपण शस्त्रक्रियेसाठी मिळणारे हृदय हे मेंदू मृत झालेल्या व्यक्तिकडून मिळते. हृदयारोपणासाठी कोणाच्या तरी मृत्यूची वाट पाहावी लागते. या रोपणानंतर काही शंभर वर्षाचे आयुष्य मिळत नाही; पण माणसाला श्वास घ्यायची सहजता उपलब्ध होते, आयुष्य जगण्यातला आनंद परत मिळतो. लहान मुले पुन्हा आनंदाने नाचू-बागडू लागतात. मोठी माणसे नित्याची कामे करू लागतात.

हृदयाचा त्रास काही लोकांना जन्मजात असतो. काहीजणांना कौटुंबिक परंपरेने येतो तर काहीजणांना लहानपणापासून जडतो. हृदयाची झडप बदलता येते; पण, जर हृदयाचा पंप बिघडला तर मात्र पूर्ण हृदयच बदलावे लागते. हा पंप बिघडल्यावर रक्त पुढे ढकलले जात नाही आणि ते फुफ्फुसात साठून राहू लागते. अशावेळी मोकळा श्वास घेता येत नाही. यावर मग औषधे दिली जातात. यासाठी जगात फक्त चारच औषधे उपलब्ध आहेत. ती काही पंप दुरुस्त करीत नाहीत तर, आजार पुढे ढकलतात. पण औषधालाही काही मर्यादा असतात. काही दिवसांनी हा आजार औषधाला दाद देत नाही. एखादा रबरबँड जास्तीतजास्त ताणला गेल्यावर तो जशी त्याची लवचिकता घालवून बसतो तसे हृदयाचे होते. मग मात्र हृदयारोपणाशिवाय पर्याय उरत नाही. हृदयाचे ठोके अनियमित पडू लागल्यावर उपाय आहेत पण, तेही थकल्यावर रोपणच करावे लागते. पंप बिघडल्यावर काही दिवस कृत्रिम हृदयावर काम चालवावे लागते, पण त्यालाही मर्यादा आहेत. रोपण करणे नैसर्गिक आहे. रुग्ण जेव्हा या व्याधीने आजारी असतो, तेव्हा त्याला आतून ते जाणवते, पण इतरांना दिसत नाही. त्याला श्वास घ्यायला त्रास होत असतो. रात्री झोपल्यावर पायाकडचे रक्त हळूहळू हृदयाकडे जमू लागते. पंप चालू नसल्याने श्वास घ्यायला दम लागतो. मग रुग्ण अंथरुणावर उठून बसतो. रक्त परत पायाकडे जाते व रुग्णाला क्षणिक बरे वाटते. असे रुग्ण मग रुग्णालयाकडे वारंवार येतात. तोंडाने घेण्याच्या औषधाऐवजी मग त्यांना इंजेक्शने द्यावी लागतात. कृत्रिम हृदय लावावे लागते.

हृदयारोपणासाठी सरकारकडे नोंदणी करावी लागते. अमेरिकेत दरवर्षी दहा हजार लोक हृदयारोपणासाठी नोंदणी करतात, परंतु, केवळ अडीच हजार लोकांनाच हृदय मिळते. युरोपमध्ये दरवर्षी ८०० तर भारतात ३०-४० रोपणे होतात. मृत्यूनंतर आपले सर्व शरीर जाळले जाते अथवा पुरले जाते आणि मृत शरीराबरोबर सर्व अवयवही वाया जातात. अशी शरीरे जाळण्या अथवा पुरण्याऐवजी त्यातले हृदय, डोळे, मूत्रपिंड, यकृत, त्वचा यांचे दान केले, तर बऱ्याच गरजू लोकांना जीवन लाभू शकते.

हृदयरोपणानंतर रुग्णावर कोणतेही बंधन राहत नाही. एखाद्याचे हृदय दुसरे शरीर स्वीकारेल का, यासाठी रक्तगट, हृदयाचे वजन व आकार पाहिले जातात. त्यासाठी बऱ्याच तपासण्या असतात. फुफ्फुसात जमलेल्या रक्ताचा दाब नवीन हृदय पेलू शकेल का हेही पाहावे लागते. तसेच नवीन हृदय बसवल्यावर त्याचा दुष्परिणाम मूत्रपिंड, यकृत यावर काही होत नाही ना, ते पाहावे लागते. लहानपणी लसीकरण केले असले, तरी हृदयारोपणापूर्वी परत एकदा लसीकरण करावे लागते. म्हणजे, बरेचसे दुष्परिणाम टळतात.

मेंदू मृत झालेल्या माणसाचे हृदय कधी मिळेल हे सांगता येत नाही. त्यामुळे, ज्याला ते हवे त्याने नेहमी तयारीत असावे लागते. मात्र अमेरिकेत आता कृत्रिम हृदय अगदी छोट्या, म्हणजे अंगठ्याएवढ्या आकारात व टिकाऊ पद्धतीचे मिळू लागल्याने ती वापरणारे लोक आता हृदयारोपण नको म्हणतात कारण, अमेरिकेत

हृदय मिळायला ३-३/ ४-४ वर्षे वाट पाहावी लागते. कोरोनाने मृत झालेल्या लोकांची हृदये वापरता येत नाहीत. भारतात सर्वसाधारणपणे ४५-४६ दिवस वाट पाहावी लागते. पण हा काळ कोरोनामुळे २ ते ३ महिने झाला आहे. रोपण झालेल्या रुग्णात मृत्यूचे प्रमाण खूप कमी आहे. रोपणापूर्वी कृत्रिम हृदयावर असताना मरणाऱ्यांची संख्या जास्त असते पण रोपणानंतर ती नगण्य होते.

एका रुग्णाच्या हृदयाला लहानपणी भोक होते. नंतर ३२ व्या वर्षी त्याचे हृदय काम करीनासे झाले. मग त्याचे रोपण केल्यावर तो इतका बरा झाला की आता तो परदेशी एकटा जाऊ शकतो. त्याला आता मूलसुद्धा झाले आहे.

७ वर्षाच्या एका मुलाचे हृदय तीन-चार वेळा बिघडले. ते मूल कृत्रिम हृदयावर २२ दिवस होते. पण नंतर केवळ औषधाने बरे झाले.''

व्याख्यानानंतर झालेल्या श्रोत्यांच्या प्रश्नोत्तरांत १२-१३ प्रश्न विचारण्यात आले.

**'Relevance of Ramanujan in Today's Context'**

56th lecture in the series of Vidnyanganga was organized on Friday, 15th January, 2021 through Zoom app and facebook on the topic 'Relevance of Ramanujan in Today's Context'.

This lecture was attended by 16 people on Zoom app and was delivered by Prof. R. Balsubramanian, retd. Director of Institute of Mathematical Sciences, Chennai. He first narrated the brief biography of Shrinivas Ramanujan.The notable point in the life of Ramanujan is, on his paper on, ' Highly Composite Numbers' he was awarded BA at Cambridge University in 1916. Seeing his talent in Mathematics, the Royal Society offered him membership in 1918. His first published paper was on a problem on, 'What is the value of under root 1 + under root 2 + under root 1+3 under root 1...'

He also published a paper on Bernoulli's number.

Partition of number n - p(n) can be written in many ways. eg. p(4) = 5. since 4 can be written as 4, 3+1, 2+2, 2+1+1, 1+1+1+1 and

p(5)= 7. 5 can be written as 5, 4+1, 3+2, 2+2+1, 2+1+1+1, 1+1+1+1+1

Value of p(n) increases very fast. as p(100) = 190569292 and p(1000) = 32 digit number.This study was initiated by Euler and Ramanujan was interested in it. He studied many conjectures in it. When Ramanujan worked on Asymptotic formula, Hardy, his mentor, was interested in it. This circle method in Number theory took birth. This circle method became a powerful tool to solve many problems as envisaged by Hardy,Littlewood, Davenport, Vinogradov and others using the Circle method. The weaker conjecture was settled by Harold Helfgott some 10 years back. Further, Henryk Inaniec, Ritabrata Munish and others have used a different form of Circle method to estimate exponential sums.

Hardy and Ramanujan tackled a problem of Number of Prime factors of an integer like 15 = 3x5, 45 = 3x3x5, 120= 2x2x2x3x5. Thus w(15) = 2, w(45) = 2 and w(120) = 3. Thus w(n) can be as large as logn/loglogn

Mr. Vijayraghavan referred this problem in 1929 to Mr. S.S.Pilai and he announced the important breakthrough to Mr.Hardy. Then Mr.S.S.Pilai's student Mr.L.G.Sathe further solved the problem in 1953 and 1954.Thus, many Mathematicians in India and abroad are still working on Ramanujan and its useful applications.

Ramanujan is also known for his Tau function.

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार २०२०-२१ जाहीर

**चंद्रशेखर तांदळे व गायत्री सावजी यांना सामाजिक पुरस्कार,**
**हर्षद राव व निकिता पवार यांना क्रीडा पुरस्कार,**
**तर मानसी जोशी विशेष युवा क्रीडा पुरस्काराची मानकरी**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०२०-२१' ची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या युवक-युवतींना सामाजिक युवा पुरस्कार देण्यात येतो. तसेच महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे क्रीडा पुरस्काराचे

उद्दिष्ट आहे. सदरील पुरस्कारांचे वितरण नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक व प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.

या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार चंद्रशेखर तांदळे, वाळवा, जि. सांगली (दुष्काळग्रस्ताना 'एक ओंजळ दुष्काळग्रस्तांसाठी' हे अभियान राबविले. ग्रामीण, दुर्गम व डोंगरी भागातील नागरिक मुख्य प्रवाहात यावेत यासाठी सातत्याने प्रबोधन) व गायत्री सावजी, जि. बुलडाणा (बुलडाणा जिल्ह्यातील विविध ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी आरोग्य शिबिर, शेतकरी आत्महत्या, गर्भपात या विषयावर समाजप्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन, मुलींसाठी दशा व दिशा यावर मार्गदर्शन)

**क्रीडा पुरस्कार** : 'युवक व युवती' क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हर्षद राव, पुणे (गिर्यारोहण लडाख ६०१० यशस्वी चढाई, वयाच्या १९ व्या वर्षी माउंट एवरेस्टवर विजय) व निकिता पवार, उस्मानाबाद, (खो खो - राज्य व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पारितोषिके) यांना जाहीर झाले आहे. मानसी जोशी (पॅरा बॅडमिंटन: जागतिक स्पर्धेत रौप्य पदक व कास्य पदक पारितोषिके) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय विशेष युवा क्रीडा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी २१ हजार रु. रोख, व सन्मानपत्र असे आहे. तर विशेष युवा क्रीडा पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये रोख व सन्मानपत्र असे आहे. यंदाचे हे पुरस्काराचे २४ वे वर्ष आहे.

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१९-२० ची पारितोषिके जाहीर

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१९-२०'साठी विजयी महाविद्यालयांची नावे घोषित करण्यात आली आहेत.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्य महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पहावयास मिळते. या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कविता लिहणाऱ्या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवांना आपले मत मांडायची संधी देतानाच त्यांच्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या नियतकालिकांचे महत्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट नियतकालिकांचा सन्मान करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे. यावर्षीपासून विद्यापीठनिहाय प्रत्येकी एक अशा विशेष पारितोषिकाचा समावेशही या स्पर्धेत करण्यात आला होता.

नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी च्या 'प्रेरणा' (वाङ्मय विशेषांक) या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला असून रु. १०,००० चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या बक्षिसाचे स्वरूप आहे. 'प्रेरणा' नियतकालिकाचा हा अंक विद्यार्थ्यातील सर्जनशीलता, भाषिक आविष्कार, प्रतिभा यांना चालना देणारा आहे. या अंकामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील विचार, कल्पना, अपेक्षा यांना लालित्यपूर्ण भाषेत शब्दरूप मिळाले आहे. तसेच या अंकाच्या निमित्ताने निरनिराळे साहित्य, वाङ्मय विद्यार्थ्यांकडून वाचले जाईल. त्यांच्यातील वाचनसंस्कार आणि वाचनसंस्कृती अभिवृद्धित होण्यासाठी हा विशेषांक प्रेरणा देणारा ठरेल.

द्वितीय क्रमांक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता. जुन्नर, जि पुणे या महाविद्यालयाच्या 'गुरुवर्य' (पर्यटन विशेषांक) या नियतकालिकास मिळाला आहे. रु. ७,०००चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या बक्षिसाचे स्वरूप आहे. या अंकात संपूर्ण जुन्नर तालुक्याचा निसर्गखजिना वाचकांसमोर उपलब्ध केला गेला आहे. जुन्नर तालुक्याला ऐतिहासिक झालर तर आहेच, त्यासोबतच निसर्गाची मोठी देणगी लाभली आहे, हे या अंकातून दिसून येते. लेणी, किल्ले, अर्थशास्त्र पर्यटन स्थळ, भौगोलिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, या सगळ्या माहितीने हा अंक परिपूर्ण आहे. भविष्यात या अंकाचा पर्यटकांना निश्चितच फायदा होईल.

तृतीय क्रमांक विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूरच्या 'विवेक' (भाषा विशेषांक) या नियतकालिकास मिळाला असून रु. ५,००० चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या बक्षिसाचे स्वरूप आहे. भाषा ही विविध प्रकारांनी मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून असलेली गोष्ट असल्याने तिच्याकडे पाहण्याच्या विविध रीती आणि दृष्टिकोन संभवतात. साहजिकच तिच्या व्याख्याही निरनिराळ्या प्रकारे केल्या गेल्या आहेत. हे आपल्याला या अंकातून पहावयास मिळते. तसेच या अंकात कला, क्रीडा, भाषा साहित्य आणि संस्कृती या सगळ्या बाबींचा लेख स्वरूपात आवर्जून उल्लेख करण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त विद्यापीठनिहाय प्रत्येकी एक पारितोषिक अशी

एकूण नऊ पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. रु. ३,००० चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या बक्षिसाचे स्वरूप आहे. त्यांची नावे अशी – कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सिडको, नाशिक यांच्या 'एकता' (लिंगभाव समानता विशेषांक) नियतकालिकास, लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव यांच्या 'जागर' (प्लास्टिक बंदी आणि पर्यावरण विशेषांक) या नियतकालिकास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद यांच्या 'विवेकानंद' या नियतकालिकास, द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांच्या 'दयानंद' या नियतकालिकास, हिल्पोस कॉलेज, नागपूर यांच्या 'हिलसोपियन' या नियतकालिकास, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अप्लिकेशन फॉर विमेन, शिरगाव, रत्नागिरी यांच्या 'तरंग' या नियतकालिकास, महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नसरुद्दीन पंजवानी वाणिज्य महाविद्यालय, अस्मोनी, जि. गडचिरोली यांच्या 'शब्दशिल्प' या नियतकालिकास, भारतीय महाविद्यालय, अमरावती यांच्या 'भारती' या नियतकालिकास तर शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या 'शिववाणी' या नियतकालिकास विशेष पारितोषिके जाहिर करण्यात आले आहेत.

निवड झालेल्या सर्व महाविद्यालयांचे प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अभिनंदन केले असून सदर पारितोषिके त्या-त्या महाविद्यालयात जाऊन समारंभपूर्वक वितरीत केली जातील, असे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## भारतीय संविधान जागरण अभियान

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने 'भारतीय संविधान संस्कृती संवर्धन' असा एक विचार विनिमयाचा गट निर्माण करण्यात आला आहे. या गटातील चर्चेतून संविधान अधिकाधिक लोकांपर्यंत कसं पोहोचवता येईल, त्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवता येतील, याबाबत चर्चा झाली, या विचार विनिमयातून पुढे आलेल्या कार्यक्रमांची सुरुवात आपण करीत आहोत.

आपला देश लोकशाही गणराज्य आहे. म्हणजेच आपण सर्व नागरिक आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यातर्फे त्याचा कारभार करत असतो. आपल्या संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी केलेली आहे. राज्यकारभार कसा चालवावा एवढेच नव्हे, तर तो काय उद्दिष्टांनी चालवावा याचे दिग्दर्शन संविधानात आहे. त्यामुळे सजग नागरिकत्वासाठी संविधानातील किमान मूल्ये व सूत्रे समजून घेणे गरजेचे आहे. आपल्या नागरिकत्वाची ती पूर्वअट आहे.

यादृष्टीने सर्वसामान्य नागरिकांना संविधानातील प्रमुख बाबींचा सुबोध परिचय करून देण्यासाठी व या नागरिकांनी संवादक बनून इतरांना तो सुबोधपणे समजावण्यासाठी आम्ही हा 'संविधान परिचय वर्ग' सुरू करत आहोत. वर नमूद केल्याप्रमाणे तो दर रविवारी असेल. एकूण पाच रविवार हा वर्ग चालेल. एक वर्ग संपला की दुसरा वर्ग असे नियमितपणे हे वर्ग चालविण्याचा आमचा मानस आहे. सर्व वयोगटांतील स्त्री-पुरुषांसाठी प्रवेश खुला आहे.

पहिल्या वर्गासाठीचे प्रवेश सुरू करत आहोत. या वर्गासाठीचे शुल्क प्रत्येकी ५०० रु. आहे. यात दोन चहा व एकवेळच्या जेवणाचा खर्च समाविष्ट आहे. वर्गाच्या शेवटी सहभागित्वाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रवेशासाठी एक गुगल फॉर्म भरून द्यावा लागेल. त्यासाठी खालील ईमेल आयडी अथवा फोन क्रमांकावर संपर्क करावा. प्रत्येक वर्ग मर्यादित संख्येचा असल्याने प्रवेश मागणाऱ्या प्रत्येकास पहिल्या वर्गात प्रवेश मिळेलच असे नाही. ज्यांना पहिल्या वर्गात घेता येणार नाही, त्यांना पुढील वर्गांसाठीच्या प्रतीक्षा यादीवर ठेवण्यात येईल. अधिकाधिक लोकांनी यासाठी नोंदणी करून प्रवेश घ्यावा, ही विनंती

नोंदणीसाठी संपर्क : मनिषा खिल्लारे ९०२२ ७१६ ९१३

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
**आयोजित**

### संविधान परिचय वर्ग

सत्रे १५ । प्रत्येक सत्र २ तास । प्रत्येक रविवारी ३ सत्रे ।
एकूण ५ रविवार । वेळ : स. ११ ते सायं. ६
प्रारंभ : ११ एप्रिल २०२१, महात्मा फुले जयंती

### संविधान मालिका शिबिर

**संविधान मालिका पाहू; संविधान समजून घेऊ**

स्वातंत्र्याच्या तसेच सामाजिक सुधारणांच्या दीर्घ संग्रामातून

उत्क्रांत झालेली मूल्ये भारताच्या संविधानात ग्रंथित झालेली आहेत. ज्यांनी हा संग्राम केला तेच या संविधानाचे निर्माते आहेत. अनेक मुद्द्यांवर मतभिन्नता असलेल्या या नेत्यांचे वाद-विवाद आणि त्यातून साधलेली सहमती यांचे दर्शन संविधान सभेतील चर्चांत प्रत्यही दिसत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील संविधान निर्मितीची ही महान प्रक्रिया समजून घेणे हे म्हणूनच उद्बोधक, ज्ञानवर्धक व दिशादर्शक आहे. आपले नागरिकत्व सजग बनवणारे आहे.

याबद्दलचे विपुल वाङ्मय उपलब्ध आहे. ते वाचायला हवे. तथापि, ते वाचणे सगळ्यांनाच शक्य होते असे नाही. त्याची गरज पटलेली असते असेही नाही. म्हणूनच मुळातून या बाबी वाचायला आपण प्रवृत्त व्हावे, नाहीच वाचता आले तरी किमान बाबी आपल्याला रोचकपणे समजाव्यात यासाठी ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेली 'संविधान' मालिका खूप उपयुक्त आहे. राज्यसभा वाहिनीवर काही वर्षांपूर्वी दहा भागांची ही मालिका झाली. प्रत्येक भाग सर्वसाधारणपणे पाऊण तासाचा आहे. यूट्यूबवर हे सगळे भाग उपलब्ध आहेत.

ते आपण एकट्यानेही पाहू शकतो. मात्र पाहताना काही प्रश्नही आपल्या मनात तयार होतात. त्यांबाबत अधिक समजून घेण्यासाठी चर्चेची आपल्याला गरज वाटते. त्यासाठी एकत्र ही मालिका पाहणे व एकएक भाग संपल्यावर त्यावर चर्चा करणे अधिक उपयुक्त व समृद्ध करणारे ठरते असा असे प्रयोग करणाऱ्यांचा अनुभव आहे.

म्हणूनच, आम्हीही मोठ्या पडद्यावर या मालिका पाहणे व त्यांवर मध्ये मध्ये संविधानाच्या प्रचार-प्रसारात सक्रिय मंडळींच्या सोबत चर्चा करणे असा उपक्रम आयोजित करत आहोत. तीन दिवसांचे हे शिबीर असेल. शिबिराच्या तारखा व स्थळ लवकरच जाहीर करण्यात येईल.

**प्रस्तावित उपक्रम**

**१. संविधान संसाधन केंद्र**

उद्देश: भारतीय संविधानातील मूल्ये, सूत्रे तसेच अन्य महत्वाच्या घटकांविषयी भारतीय नागरिकांना सजग करण्यासाठीच्या प्रयत्नांना आवश्यक संस्थानांचे साहाय्य करणे

**२. संविधान महोत्सव**

या विचार विनिमय गटात मा. सुप्रिया सुळे यांच्या समवेत ॲड. सुरेश माने, सुरेश सावंत, कुणाल गायकवाड, प्रा. प्रज्ञा दया पवार, प्रा. सुभाष वारे, प्रा. मंजुश्री पवार, लोकशाहीर संभाजी भगत, प्रा. मिलिंद आव्हाड, ॲड. निलेश खानविलकर, भक्ती भावे, मारुती शेरकर, वीरेंद्र गुल्हाने, विनिता सिंग, अनिल पाझारे हे सहभागी असून दत्ता बाळसराफ हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

आपला देश लोकशाही गणराज्य आहे. म्हणजेच आपण सर्व नागरिक आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यातर्फे त्याचा कारभार करत असतो. आपल्या संविधानाच्या उद्देशिकेची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी केलेली आहे. राज्यकारभार कसा चालवावा एवढेच नव्हे, तर तो काय उद्दिष्टांनी चालवावा याचे दिग्दर्शन संविधानात आहे. त्यामुळे सजग नागरिकत्वासाठी संविधानातील किमान मूल्ये व सूत्रे समजून घेणे गरजेचे आहे. आपल्या नागरिकत्वाची ती पूर्वअट आहे.

यादृष्टीने सर्वसामान्य नागरिकांना संविधानातील प्रमुख बाबींचा सुबोध परिचय करून देण्यासाठी व या नागरिकांनी संवादक बनून इतरांना तो सुबोधपणे समजावण्यासाठी आम्ही हा 'संविधान परिचय वर्ग' सुरू करत आहोत. वर नमूद केल्याप्रमाणे तो दर रविवारी असेल. एकूम पाच रविवार हा वर्ग चालेल. एक वर्ग संपला की दुसरा वर्ग असे नियमितपणे हे वर्ग चालविण्याचा आमचा मानस आहे. सर्व वयोगटांतील स्त्री-पुरुषांसाठी प्रवेश खुला आहे.

पहिल्या वर्गासाठीचे प्रवेश सुरू करत आहोत. या वर्गासाठीचे शुल्क प्रत्येकी ५०० रु. आहे. यात दोन चहा व एकवेळच्या जेवणाचा खर्च समाविष्ट आहे. वर्गाच्या शेवटी सहभागीत्वाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रवेशासाठी एक गुगल फॉर्म भरून द्यावा लागेल. त्यासाठी खालील ईमेल आयडी अथवा फोन क्रमांकावर संपर्क करावा. प्रत्येक वर्ग मर्यादित संख्येचा असल्याने प्रवेश मागणाऱ्या प्रत्येकास पहिल्या वर्गात प्रवेश मिळेलच असे नाही. ज्यांना पहिल्या वर्गात घेता येणार नाही, त्यांना पुढील वर्गांसाठीच्या प्रतीक्षा यादीवर ठेवण्यात येईल.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस;

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ति, विश्वास श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधान सभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत: प्रत अर्पण करीत आहोत.

# शिक्षण विकास मंच

**लक्ष देण्याचे कौशल्य – डॉ.यश वेलणकर**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या वेबिनार शिक्षणकट्ट्यावर डॉ.यश वेलणकर यांनी अतिशय सोप्या भाषेतून लक्ष देण्याच्या कौशल्याची अनुभूती सर्वांना दिली.

या संवादास शिक्षक, पालक, विद्यार्थी यांनी भरभरून प्रतिसाद दिला. झुम आणि फेसबुकच्या माध्यमातून पाच हजार लोकांनी हा कार्यक्रम लाईव्ह पाहिला. या संदर्भात शेकडो कमेंट्स आल्या.

❖❖❖❖❖❖❖

**वर्गाध्यापन ते ONLINE अध्यापन**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित वेबिनार शिक्षणकट्टा 'वर्गाध्यापन ते ONLINE अध्यापन' यास प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. विषयाचे व्याख्याते श्री. अजित तिजोरे यांनी ऑफलाईन वर्गध्यापनातून सुरू झालेला स्वतःचा प्रवास ONLINE अध्यापनापर्यंत कसा घडला. याचे अनुभवकथन केले. रयत शिक्षण संस्थेचे श्री. संजीव अक्कलकोटे यांनी सामाजिक शास्त्राचा आधार घेऊन प्रत्यक्ष ONLINE शिक्षण ते कसे देतात, याची मांडणी केली.

**जो चीज़ आपको चॅलेंज करती है,**
**वही चीज़ आपको चेंज करती है...**

हा मूलमंत्र घेऊन आपण ONLINE शिक्षणात कसे घडत गेलो, सोबतच यामुळे शाळा आणि मुले यांची प्रगती कशी झाली, याचे सादरीकरण महाराष्ट्राला परिचित असलेले तंत्रस्नेही शिक्षक बालाजी जाधव यांनी ONLINE प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून केले. 'शिक्षण विकास मंचाच्या प्रेरणेमुळेच आपण इथपर्यंत आलो आहोत,' असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. श्रीमती बसंती रॉय यांनी आपल्या अभ्यासपूर्ण शैलीतून सर्व वक्त्यांना बोलते केले. श्री. जयवंत कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास तांत्रिक साहाय्य श्री. विश्वनाथ खंदारे यांनी केले.

झुमच्या माध्यमातून कार्यक्रमास १०० सदस्य प्रत्यक्ष सहभागी झाले होते तर फेसबुकच्या माध्यमातून ५,५१२ लोकांनी हा कार्यक्रम लाईव्ह पाहिला. सुमारे २०० जणांनी या कार्यक्रमाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या.

❖❖❖❖❖❖❖

**सायबर सेफ्टी फॉर टीचर्स**

विषयाची मांडणी डॉ. दिप्ती लेले यांनी केली. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी 'सायबर सेफ्टी का व कशी घ्यावी' याचे कथन केले.

वैयक्तिक, संस्थेची माहिती याचा दुरुपयोग होऊन आपली सुरक्षा धोक्यात येऊ शकते, याबाबतीत आपण काय काळजी घ्यावी, याची मांडणी अतिशय सोप्या, सहज भाषेत सर्वांना समजेल अशा रीतीने केली. शिक्षण विकास मंचाच्या सोबतीने भविष्यातदेखील सर्वांसोबत संवाद साधायला आवडेल अशी भावना त्यांनी त्यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. काळपांडे यांनी डॉ. कुमुद बन्सल यांच्या आठवणी सांगून त्यांना अभिवादन केले व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या निमित्ताने शुभेच्छाही दिल्या. आपल्या खास शैलीतून बसंती रॉय यांनी वेबिनारच्या वक्त्या डॉ. दिप्ती लेले यांचा परिचय करून दिला व विषयाचे महत्त्व प्रतिपादन केले. शिक्षण विकास मंचाचे समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे तंत्रज्ञ श्री. विश्वनाथ खंदारे यांनी साहाय्य केले.

कार्यक्रमात झुमच्या माध्यमातून सदस्य प्रत्यक्ष सहभागी झाले होते तर फेसबुकच्या माध्यमातून ३,३६१ लोकांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचला. कार्यक्रमास ११०० व्ह्युज मिळाले. सुमारे २०० लोकांनी या कार्यक्रमाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या.

❖❖❖❖❖❖❖

**इलेक्ट्रॉनिक माध्यम संवादाचा भाषा अध्यापनात वापर – धनवंती हर्डीकर**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्यावतीने शिक्षक, पालक आणि शिक्षणप्रेमी यांच्यासाठी वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्य साधून वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारमध्ये बालभारतीच्या माजी विद्यासचिव श्रीमती धनवंती हर्डीकर यांनी 'इलेक्ट्रॉनिक माध्यम संवादाचा भाषा अध्यापनात वापर' यावर मार्गदर्शन केले.

या वेबिनारमध्ये संवाद साधत असताना व्हॉट्सॲप, फेसबुक, ईमेल, ब्लॉग्स, गुगल या इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर भाषेच्या शैलीत कसा बदल घडवून आणतो याची प्रात्यक्षिकांसह रंजक व चिकित्सक पद्धतीने मांडणी त्यांनी केली.

संपूर्ण राज्यभर पावसाचे थैमान आणि वाचन प्रेरणा दिनाचे अनेक कार्यक्रम असूनही राज्यभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. झुम आणि फेसबुकच्या माध्यमातून हा कार्यक्रम ४२५१ लोकांपर्यंत पोहचला. ११०० व्ह्युज व खूप मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या. सहभागी झालेले सर्व अधिकारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे आयोजकांनी आभार मानले.

### ‘दहावी आणि बारावीच्या परीक्षा झाल्याच पाहिजेत,’ शिक्षण विकास मंचावरील चर्चासत्रात झाले मतैक्य

करोनामुळे उद्भवलेल्या अनिश्चिततेमुळे चालू शैक्षणिक वर्षात १० वी व १२ वी बोर्डाच्या परीक्षा कधी आणि कशा होणार, याबाबत राज्यातील लाखो विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यामध्ये असलेले संभ्रम आणि चिंतेचे वातावरण दूर व्हावे, यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांना दिनांक २१ ऑक्टोबर २०२० रोजी एक पत्र लिहून दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या आयोजनाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या होत्या.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचाने दिनांक १० ऑक्टोबर २०२० रोजी एक ऑनलाइन चर्चासत्र आयोजित केले. या चर्चासत्रात महाराष्ट्रातील अनुभवी शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि आजी-माजी अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या चर्चासत्रात दहावी आणि बारावीच्या परीक्षा झाल्याच पाहिजेत, याबद्दल सर्व सदस्यांचे एकमत झाले. चर्चासत्रात मतैक्य झालेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. दहावी आणि बारावीच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने न घेता, परीक्षा नेहमीप्रमाणे लेखी स्वरूपात ऑफलाइनच असाव्यात. प्रश्नपत्रिकांच्या आराखड्यात बदल करण्यात येऊ नयेत. अंतर्गत गुणांचे प्रमाणही सध्याएवढेच असावे. शाळांना विषयवार प्रश्नपेढी देण्यात यावी. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून विषयवार किमान तीन-चार प्रश्नपत्रिका सोडवून सराव घ्यावा. तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षांऐवजी गृहकार्य, स्वाध्याय, प्रकल्प यांच्या आधारे अंतर्गत मूल्यमापन करण्यात यावे.

२. ग्रामीण, तसेच शहरी झोपडपट्टी क्षेत्रातील सुमारे ३५% विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन शिक्षण पोहोचलेले नाही. त्यामुळे शाळांनी पूर्ण वर्षाचा अभ्यासक्रम नोव्हेंबरपासून किमान १०वी-१२वीचे वर्ग सुरू करून पूर्ण करून घेणे आवश्यक राहील. शिक्षक व शिक्षक संघटना यांना विश्वासात घेऊन व त्यांच्या सहकार्याने नोव्हेंबर ते एप्रिलच्या मध्यापर्यंत रविवारखेरीज सर्व दिवस शाळा सुरू ठेवून ७५% अभ्यासक्रम पूर्ण करून घेणे शक्य आहे. या काळात शैक्षणिक सहली, स्नेहसंमेलने, क्रीडास्पर्धा, विशेष दिवस साजरे करणे हे उपक्रम घेण्याचे शाळांनी टाळावे, दहावी-बारावीच्या परीक्षा एप्रिल व मे महिन्यात घ्याव्यात.

३. विदर्भ आणि मराठवाडा भागातील कडक उन्हाळा लक्षात घेता पेपरची वेळ सकाळची ठेवणे विद्यार्थ्यांसाठी सोयीचे होईल. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयात परीक्षा देणे अधिक सोयीचे ठरेल.

४. प्रत्येक शाळेकडून त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी काळजीपूर्वक सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्या जातील, त्यामुळे विद्यार्थ्यांवर ताण येणार नाही. पर्यवेक्षक व परीक्षा केंद्रसंचालक हे बाहेरचे असावेत. त्यासाठी शाळाशाळांतील शिक्षकांची अदलाबदल करणे अधिक सोयीचे होईल.

५. राज्यभरातील ३३ लाख विद्यार्थ्यांच्या दहावी-बारावीच्या परीक्षांची गुणवत्ता व विश्वासार्हता ढासळू न देता त्या वेळेवर आयोजित करण्याची जबाबदारी शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांच्या संघटनांनी आणि शासकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक पुढाकार घेऊन पार पाडणे, हा आपला अग्रक्रम असला पाहिजे. अशा सूचना चर्चासत्रात पुढे आल्या.

**दिनांक २६ नोव्हेंबर २०२०**

**‘१०० दिवसात १०वी’ शिक्षण परिषदेचे उत्साहात उद्‌घाटन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई शिक्षण विकास मंच व महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ आणि पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘१०० दिवसात १० वी’ या दहाव्या शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्‌घाटनाचे पहिले सत्र दिनांक २६ नोव्हेंबर २०२० रोजी उत्साहात पार पडले.

परिषदेच्या उद्‌घाटनाच्या सुरुवातीला शिक्षण विकास मंचाच्या मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी सर्वांचे स्वागत करून शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या कार्याचा परिचय उपस्थिताना करून दिला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्याध्यक्ष व शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा.सुप्रिया सुळे आणि मुख्य संयोजक डॉ.वसंत काळपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंच यशस्वीपणे वाटचाल करीत आहे असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ आणि पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ यांच्या कार्याचा परिचय करून देत या उपक्रमात सहभागी होण्यामागची भूमिका महामंडळाचे राज्याचे अध्यक्ष विजय गायकवाड यांनी मांडली.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.वसंत काळपांडे यांनी कोविडच्या पार्श्वभूमीवर ‘१०० दिवसात १०वी’ या विषयावरची परिषद आपण का आयोजित करीत आहोत, या संदर्भातील भूमिका प्रास्ताविकात मांडली. परिषदेत तज्ज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार असल्याने त्याचा उपयोग दहावी शिकविणाऱ्या शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्‌घाटनसत्रात जे शिक्षक सहभागी झाले होते, त्यांना प्रशिक्षणाच्या अनुषंगाने सर्वश्री अरूण थोरात, जे.के.पाटील, डॉ. वसंत काळपांडे व श्रीमती बसंती रॉय यांनी मार्गदर्शन केले.

श्री. हरिश्चंद्र गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. आपल्या अभ्यासपूर्ण व खुमासदार शैलीत वैशाली सरवणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमात युट्युब आणि फेसबुकच्या माध्यमातून एक हजार शिक्षक सहभागी झाले होते. ५ हजार ७१५ व्ह्युज व अकराशे सकारात्मक प्रतिक्रिया आल्या आहेत. २९२ जणांनी हा कार्यक्रम शेअर केला आहे. हा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

२८, २९, ३० नोव्हेंबर आणि ५ व ६ डिसेंबर २०२० या दिवशी शिक्षक परिषदेअंतर्गत विविध विषयांवरचे शिक्षक प्रशिक्षण देण्यात आले. टेलिग्राम समूहावरील ११ हजार तर शिक्षण विकास मंच फेसबुक समूहावरील एकूण १० हजार शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. ऑनलाईन आणि यु-ट्युबच्या माध्यमातून राज्यभरातील दीड लाख शिक्षकांनी या प्रशिक्षणात भाग घेतला.

## देशोदेशीच्या शिक्षणपद्धती व्याख्यानमाला

**प्रत्येक शनिवारी संध्याकाळी ५ ते ६.३०**

**१९ डिसेंबर २०२०**
देशोदेशीचं शिक्षण - अभ्यासाची गरज आणि अडचणी
**- किशोर दरक**

**२६ डिसेंबर २०२०**
फिनलंड जगाकडून काय शिकला?
**- डॉ. हेरंब कुलकर्णी आणि डॉ. शिरीन कुलकर्णी**

**२ जानेवारी २०२१**
मलेशियाची शिक्षणपद्धती
**- डॉ. मधुरा फडके**

**९ जानेवारी २०२१**
ओमानची शिक्षणपद्धती
**- शिवकन्या शशी, मस्कत**

**१६ जानेवारी २०२१**
अमेरिकेची शिक्षणपद्धती
**- डॉ. प्रीती कामत तेलंग, रिचमंड, यूएसए**

**२३ जानेवारी २०२१**
दक्षिण कोरियाची शिक्षणपद्धती
**- धनवंती हर्डीकर**

**६ फेब्रुवारी २०२१**
इस्राएलची शिक्षणपद्धती
**- डॉ. अपर्णा लळिंगकर**

**१९ फेब्रुवारी २०२१**
स्वित्झर्लंडची शिक्षणपद्धती
**- विजय जोशी, झुरिक**

**२० फेब्रुवारी २०२१**
Cote d'Voire (Ivory Coast)ची शिक्षणपद्धती
**– उषा राणे**

**२७ फेब्रुवारी २०२१**
सिंगापूरची शिक्षणपद्धती
**– देविदास देशपांडे**

**०६ मार्च २०२१**
ऑस्ट्रेलियाची शिक्षणपद्धती
**– डॉ. विजय जोशी, सिडनी**

**१३ मार्च २०२१**
United Kingdom ची शिक्षणपद्धती
**– डॉ. राजीव बेनोडेकर, लंडन**

**२० मार्च २०२१**
कॅनडाची शिक्षणपद्धती
**– शुभांगी तांबे–विखे पाटील, टोरोंटो, कॅनडा**

**२७ मार्च २०२१**
नेदरलँड्सची शिक्षणपद्धती
**– ॲड. प्रणिता देशपांडे, हेग, नेदरलँड्स**

**०३ एप्रिल २०२१**
रशियाची शिक्षणपद्धती
**– डॉ. प्रतिभा पाटणकर आणि डॉ. नागिना माळी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**१० एप्रिल २०२१**
दक्षिण आफ्रिकेची शिक्षणपद्धती
**– डॉ. नरेंद्र देशमुख, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई**

**१७ एप्रिल २०२१**
जपानची शिक्षणपद्धती
**– डॉ. खंडाळे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**८ मे २०२१**
**व्याख्यानमालेचा समारोप (पूर्वार्ध)**

**१५ मे २०२१**
**व्याख्यानमालेचा समारोप (उत्तरार्ध)**

## देशोदेशीचं शिक्षण – अभ्यासाची गरज आणि अडचणी

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित ‘देशोदेशीच्या शिक्षणपद्धती व्याख्यानमाले’तील पहिले पुष्प ‘देशोदेशीचं शिक्षण– तुलनेची गरज व अडचणी’ या विषयावर शनिवार दि. १९ डिसेंबर २०२० रोजी गुंफले गेले. शिक्षणशास्त्राचे अभ्यासक, अतिशय स्पष्ट व परखड शब्दांत आपले मत मांडणारे शिक्षणतज्ज्ञ श्री. किशोर दरक यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीतून व्याख्यान दिले. या ऑनलाइन व्याख्यानाचा आनंद झुम व फेसबुक या माध्यमांतून शिक्षणप्रेमींनी घेतला.

व्याख्यानसत्राच्या सुरुवातीला शिक्षण विकास मंचाच्या सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी मंचाच्या शिक्षण विषयक कार्याची थोडक्यात ओळख करून दिली तसेच मंचाची उत्प्रेरक म्हणून भूमिकाही थोडक्यात स्पष्ट केली. या व्याख्यानमालेच्या प्रास्ताविकेत शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी या व्याख्यानमालेचा हेतू स्पष्ट केला. विविध देशांच्या शाळांतील शिक्षण पद्धतींवर संबंधित देशांतील ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक धोरणांचा होणारा परिणाम अभ्यासणे हा या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश असल्याचे सुतोवाच त्यांनी केले. त्या त्या शिक्षण पद्धतींमधून आपल्या देशाला, पर्यायाने आपल्या विद्यार्थ्यांना, उपयुक्त अशा गोष्टींचा आपण स्वीकार करायला हवा, असा मार्गदर्शनपर सल्लाही त्यांनी दिला.

श्री. दरक यांनी व्याख्यानाच्या सुरुवातीलाच तुलना करणे किंवा तुलनात्मक शिक्षण पद्धती एकूणच देशाच्या शैक्षणिक विकासासाठी, प्रगतीसाठी कशी उपयोगी ठरते याबाबत थोडक्यात विवेचन केले. तुलनात्मक किंवा तौलानिक शिक्षण पद्धतीचा मुख्य हेतू व साध्य यांचा प्रथमतः विचार करून त्यामध्ये स्पष्टता येणे आवश्यक आहे, असेही मत त्यांनी मांडले. भारतीय पारंपरिक पद्धतीमधील काही दाखल्यांपासून आधुनिक युगातील समाजमाध्यमांतून सर्वसामान्य लोकांपर्यंत सहज पोहोचणाऱ्या जाहिरातींमध्ये देखील तुलनेचा, तुलनात्मक पद्धतीचा वापर करून संबंधित बाब जनसामान्यांपर्यंत परिणामकारकरितीने पोहोचवली जाते, हेही त्यांनी नमूद केले.

सर्वसामान्यपणे कोणत्याही शिक्षण पद्धतीत तुलना होणे ही सहज घडणारी प्रक्रिया असते, पण ती चांगल्या गोष्टींसाठी वा स्वतःचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी होणे गरजेचे आहे, हे पटवून देताना त्यांनी महात्मा ज्योतीबा फुलेंचा दाखला दिला.

पुण्यात शाळा सुरू करण्यासाठी इंग्लंडमधील शिक्षण पद्धतीची आपल्या देशातील शिक्षण पद्धतीशी तुलना ही गोष्ट त्यावेळी कारणीभूत ठरली, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

तुलना करण्याची गरज स्पष्ट करत असतानाच त्यात येणाऱ्या अडचणींचाही विचार करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. एखाद्या देशात एखादी पद्धत यशस्वी होत असताना ती जशीच्या तशी आपल्या देशात, राज्यात वा जिल्ह्यात राबवणे तेवढे सोपे आणि योग्य नसते. या शिक्षण पद्धतीने प्रभावित होऊन पूर्वीच्या सरकारच्या काळात काही शिक्षकांनी सिंगापूर आणि फिनलंड येथील शाळांना भेटी देऊन त्यांच्या शिक्षण पद्धतीचा आपल्या देशातील मुलांना कसा फायदा होईल याबाबतही विचार व अभ्यास केला होता. या घटनेचा उल्लेख करून दरक म्हणाले, की शिक्षणाच्या पद्धती या सोयीनुसार सत्तेचा खेळ होता कामा नयेत व त्यात विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत भरडले जाऊ नयेत. शैक्षणिक वसाहतीकरण ही कल्पना रुजवण्याची प्रथा सुरू होण्याचा यात अधिक धोका असतो, अशीही भीती त्यांनी व्यक्त केली.

कोणत्याही देशातील चांगली किंवा अप्रतिम गोष्ट ही आपल्यासाठी चांगली ठरेलच असे नाही. त्यामुळे आपणही चांगली गोष्ट स्वीकारताना त्यातील अदृश्य नकारात्मक बाजू नकळत आपल्या पदरात पडते व अपेक्षित यशाला मात्र आपण मुकतो, अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी तुलनेतील धोका समोर आणला.

तुलनात्मक शिक्षण पद्धतीचा विचार करत असताना किंवा ती पद्धती राबवत असताना काही दक्षता पाळणेही गरजेचे आहे असे मत मांडत असताना, भारावलेपणातून निर्णय न घेता डोळसपणे घेऊन कॉपी-पेस्ट करणे हा प्रकार निग्रहाने टाळणे अपेक्षित आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

तुलना करण्याचा हेतू व त्यातून आपल्याला अपेक्षित साध्य लक्षात घेऊनच तुलना करावी असे त्यांनी महाराष्ट्र राज्यातील रंगीत पाठ्यपुस्तक योजनेच्या अनुषंगाने पुन्हा एकदा अधोरेखित केले.

व्याख्यान सत्राच्या समारोप प्रसंगी शिक्षण विकास मंचाचे माधव सूर्यवंशी यांनी देश, विदेशांतील उपस्थित मान्यवर तसेच राज्यातील परिचित व अपरिचित अशा सर्व शिक्षण प्रेमींचे आभार मानले.

शिक्षण विकास मंचाच्या व्यासपीठावरून अतिशय अभ्यासपूर्ण मांडणीतून एक अचर्चित विषय शिक्षण प्रेमींपर्यंत श्री. किशोर दरक यांनी पोहोचवला. हे व्याख्यान म्हणजे शिक्षण प्रेमींच्या शिक्षण समृद्ध होण्याच्या प्रवासातील एक 'माइल स्टोन' ठरेल असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

✣✣✣

## मलेशियाची शिक्षणपद्धती

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित देशोदेशीच्या शिक्षणपद्धती या व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प दिनांक २ जानेवारी २०२१ रोजी मलेशियातील शिक्षणपद्धतीच्या अभ्यासक डॉ. मधुरा फडके यांनी 'मलेशियातील शिक्षणपद्धती' या विषयावर मांडणी करून गुंफले.

मलेशियातील शिक्षणपद्धतीवर प्रकाश टाकीत असताना, आज मलेशियात कोणत्या आकृतीबंधातून शिक्षण दिले जाते, तेथील सरकारी शाळेची परिस्थिती, शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक्रम याबाबत माहिती दिली.

व्याख्यानाच्या सुरुवातीला अनुल अत्तार यांनी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या कार्याचा परिचय करून दिला. व्याख्यात्या डॉ.मधुरा फडके यांचा परिचय मंचाच्या सल्लागार बसंती रॉय यांनी करून दिला.

शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक डॉ.वसंत काळपांडे यांनी समारोप करीत असताना मलेशियातील शिक्षणपद्धतीची मांडणी केल्याबद्दल डॉ. मधुरा फडके यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास परदेशातून, देशातून, राज्यातून उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे त्यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात झुम व फेसबुकवरून १० हजार तसेच ५५१ जणांनी ऑनलाईन स्वरूपात भाग घेतला.

✣✣✣

## ओमानची शिक्षणपद्धती

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईकडून सर्व शिक्षणप्रेमींसाठी आयोजित 'देशोदेशीच्या शिक्षणपद्धती' या व्याख्यानमालेतील चौथे पुष्प दि. ९ जानेवारी २०२१ रोजी ओमानच्या शिक्षणपद्धतीच्या अभ्यासक शिवकन्या शशी यांनी 'ओमानची शिक्षणपद्धती' या विषयावर मांडणी करून गुंफले.

ओमानच्या शिक्षणपद्धतीवर प्रकाश टाकत असताना, आज ओमानमध्ये कोणत्या आकृतिबंधातून शिक्षण दिले जाते, तेथील सरकारी शाळा आणि खासगी शाळा, शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक्रम यांवर मांडणी केली. भाषा, विज्ञान, धर्म यांची सांगड घालून शिक्षण कसे दिले हे सांगताना तेथील उपक्रमांची माहिती

दिली. ओमानसारखा एक छोटा देश आपल्या शिक्षणपद्धतीकडे किती सजगपणे पाहतो याचा अनुभव व्याख्यान ऐकताना आला.

व्याख्यानाच्या सुरुवातीला ऐनुल आत्तार यांनी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या कार्याचा परिचय करून दिला. व्याख्यात्या शिवकन्या शशी यांचा परिचय शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी करून दिला. समारोप करीत असताना त्यांनी ओमानच्या शिक्षणपद्धतीची मांडणी केल्याबद्दल शिवकन्या शशी यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास परदेशातून, देशातून, राज्यातून उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमात झुम व फेसबुकवरून ७ हजार लोक तसेच ५०० ऑनलाईन एन्गेजमेंटस यांचा सहभाग होता.

## दक्षिण कोरियाची शिक्षणपद्धती

देशोदेशीच्या शिक्षणपद्धती या व्याख्यानमालेतील सहावे पुष्प दिनांक २३ जानेवारी २०२१ रोजी धनवंती हर्डीकर यांनी 'दक्षिण कोरियाची शिक्षणपद्धती' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी करून गुंफले.

दक्षिण कोरियाच्या शिक्षण पद्धतीवर प्रकाश टाकीत असताना, आज जगाला इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर ज्या देशातून केला जातो. त्या देशातील शिक्षणाची बलस्थाने कोणती आहेत, त्याचा ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अंगाने धांडोळा या व्याख्यानातून घेतला गेला.

भारतीय शिक्षण आणि दक्षिण कोरियन शिक्षणपद्धतीतील साम्यस्थळे आणि भेद, दक्षिण कोरियाची बलस्थाने, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे परिश्रम, पिसामध्ये असलेले अग्रस्थान, प्रखर राष्ट्रवाद, शिक्षणातील गुणवत्तेला असणारे महत्त्व, शिक्षण आणि उद्योगधंदे यांच्यात असणारा समन्वय आणि त्यातून उद्योगास पूरक असे तयार होणारे मनुष्यबळ आदी दक्षिण कोरियाच्या शिक्षण पद्धतीचे विविध पैलू आपल्या व्याख्यानातून मांडले. विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणात गुंतवून ठेवण्याच्या अतिरेकामुळे त्यांच्यावर येणारा ताण, उच्च शिक्षणासाठी होणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या कालावधीत कार्यालये, वाहतूक, विमान सेवा, इत्यादी बंद करण्यासारखे आश्चर्यकारक मार्ग अवलंबणारा दक्षिण कोरिया हा जगात एकुलता एक देश आहे, ही मनोरंजक माहिती त्यांनी सांगितली. श्रीमती धनवंती हर्डीकर यांनी अतिशय संयतपणे तितक्याच सहज, सोप्या, ओघवत्या शैलीत अभ्यासपूर्ण रीतीने व्याख्यानाची मांडणी केली.

व्याख्यानाच्या सुरुवातीला शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे मुख्य संयोजक डॉ.वसंत काळपांडे यांनी व्याख्यात्या श्रीमती धनवंती हर्डीकर यांचा परिचय करून दिला.

अतिशय नेमकेपणाने मांडणी करून, तब्बल २ तास १० मिनिटे चाललेल्या या व्याख्यानाचा समारोप समन्वयक डॉ.माधव सूर्यवंशी यांनी केला. या कार्यक्रमास देशातून आणि परदेशातून उपस्थित असणाऱ्या सर्व सदस्यांचे त्यांनी आभार मानले. कार्यक्रमाला फेसबुकवरून १७०० लाईक्स मिळाले.

## मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रम
## मराठी शब्दकोष समृद्ध झाला पाहिजे : गोरे

मराठी भाषेत प्रतिशब्द संशोधन गरजेचे आहे. त्यासाठी मराठी शब्दकोष समृद्ध झाला पाहिजे. मराठी भाषेत प्रज्ञावंत पिढी निर्माण झाली पाहिजे. राज्यघटनेत मराठीला राजभाषा म्हणून स्थान आवश्यक आहे, असे मत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे उस्मानाबाद केंद्राचे विभागीय अध्यक्ष श्री. जीवन गोरे यांनी व्यक्त केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

तुळजाभवानी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, सचिव बालाजी तांबे, कोषाध्यक्ष टेकाळे, सदस्य भा. न. शेळके, जगदाळे, तबस्सुम सय्यद, प्रा. डॉ. शिवाजीराव गायकवाड उपस्थित होते. मान्यवरांनी कुसुमाग्रज, बापू साळुंखे, यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी साहित्य संमेलनातील स्वयंसेवक विद्यार्थी यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले. शेवटी प्रा. राजा जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अपंग हक्क विकास मंच

**दिनांक ९ ते १३ डिसेंबर, २०२०**

**श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधीर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, स्टारकी फाउंडेशन अमेरिका, ठाकरसी ग्रुप मुंबई, पवार पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट, जगदंब प्रतिष्ठान महाराष्ट्र आणि महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ ते १३ डिसेंबर,२०२० रोजी राजमाता जिजाऊ महाविद्यालय, भोसरी, जिल्हा पुणे येथे सकाळी १०:०० ते सायं. ४:०० या वेळेत श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुलांना मोफत डिजिटल श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. या शिबिराचा एकूण १२०० लाभार्थींनी लाभ घेतला.

शिबिरासाठी प्रमुख पाहुणे मा जयंत पाटील, (जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य), धनंजय मुंडे (मंत्री- सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, महाराष्ट्र राज्य) आदी मान्यवर उपस्थित होते. मा. खा. श्रीमती सुप्रियाताई सुळे, खासदार श्री. अमोल कोल्हे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबईचे संयोजक श्री. विजय कान्हेकर, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. निलेश राऊत, अपंग हक्क विकास मंचाचे समन्वयक सुहास तेंडुलकर, इत्यादी मान्यवरांनी या कार्यक्रमाचे आयोजनात सहभाग नोंदवला. ५० कार्यकर्त्यांची टीम या शिबिरात स्वतः सहभागी झाली होती. अपंग हक्क विकास मंचाचे सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे आणि कार्यकर्ते, महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी आणि कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

**कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे दिव्यांग वधु-वर परिचय मेळावा लांबणीवर**

श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्ताने आणि मा. सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून दिव्यांगांसाठी सामूहिक वधु-वर मेळाव्याचे आयोजन करण्याचे ठरले होते. याद्वारे किमान ८० ते १०० जोडप्यांचे विवाह जुळवणे, त्यांचा विवाह करून देणे तसेच त्यांना संसारोपयोगी वस्तूंची भेट देणे अशा स्वरूपात साहेबांच्या ८० व्या वाढदिवसाची भेट दिव्यांग प्रवर्गाला देण्याचा मानस होता.

यासाठी ३ डिसेंबर, २०२० रोजीच्या जागतिक अपंग दिनी वधु-वरांच्या नोंदणीसाठी मा. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते लिंकचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. या लिंकद्वारे विवाहेच्छुक दिव्यांगांना ऑनलाईन फॉर्म भरून देण्यास सांगण्यात आले. या संबंधी माहितीच्या प्रचारासाठी एक मेसेज तयार करून व्हॉट्स अपदारे सर्व ग्रुप्सवर व्हायरल करण्यात आला. या कार्यक्रमाविषयीची ऑनलाईन माहिती स्वत: मा. सुप्रियाताईंनी फेसबुकमार्फत दिली. ही क्लिप फेसबुकच्या माध्यमातून व्हायरल करण्यात आली. फेसबुकमार्फत आमदार श्री. अमोल कोल्हे यांनी या कार्यक्रमासाठी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत. या उपक्रमाचे अनेक मान्यवरांनी कोतुक केले व शुभेच्छांचे मेसेज पाठवले आहेत.

तसेच दिनांक १२ डिसेंबर,२०२० रोजी अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक विजय कान्हेकर, श्री. नंदकुमार फुले, श्रीमती विनिता पाटील, रविंद्र झेंडे, भाग्यश्री मोरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ऑनलाईन बैठक पार पडली. या बैठकीच्या माध्यमातून दिव्यांगांना विवाह सोहळ्यासाठी फॉर्म कसा भरावा, दिव्यांगांचे विवाह होणे किती गरजेचे आहे, यामुळे या प्रवर्गात होणारे परिवर्तन, जातिबाह्य विवाह जुळले तरी पालकांनी कसे जुळवून घ्यावे अशा अनेक विषयांवर या बैठकीत चर्चा झाली. यामुळे विवाहेच्छुक दिव्यांगांना व त्यांच्या पालकांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाला दिव्यांगांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. दिनांक १५ फेब्रुवारीपर्यंत ७०० दिव्यांगांनी नोंदणी केली आहे.

नाव नोंदणी केलेल्या दिव्यांग वधु-वरांसाठी दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी निसर्ग मंगल कार्यालय, मार्केटयार्ड, पुणे येथे भव्य परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याची जोमाने पूर्वतयारी त्याचे नियोजन उत्तम प्रकारे करण्यात आले होते. प्रसार माध्यमांद्वारे याचा प्रचार व प्रसार करण्यात आला. दिव्यांगांनी आणि त्यांच्या पालकांनी फोन करून या कार्यकमासाठी उपस्थित राहण्याबाबत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. परंतु महाराष्ट्रात सुरू असलेली कोरोना आजाराची नैसर्गिक आपत्ती पुन्हा नव्याने डोके वर काढू लागली आणि कोरांनाच्या आलेल्या दुसऱ्या लाटेमुळे या कार्यक्रमावर शासनाचे निर्बंध लागले. दिव्यांगांच्या स्वास्थ्य संरक्षणासाठी शासनाने केलेल्या निर्बंधांच्या नियमानुसार तसेच जमावबंदीमुळे हा नियोजित कार्यक्रमकोरोना नियंत्रणात येईपर्यंत पुढे ढकलण्यात आला असल्याचे मंचाच्या निमंत्रक सुप्रिया सुळे यांनी समाजमाध्यमांमार्फत महाराष्ट्रातील जनतेस कळवले आहे.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई

ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञानाचे किंवा माहितीचे संग्रहण आणि जतन हा असला तरी संग्रहित ज्ञान व माहिती ग्रंथालयाच्या वाचकांपर्यंत पोहचविणे हे अविरत कार्य ग्रंथालयाकडून केले जाते. ग्रंथालयातील ग्रंथ व ग्रंथेतर साहित्य, वाचक आणि ग्रंथालयीन सेवक हे ग्रंथालयाचे तीन आधारस्तंभ आहेत. ग्रंथालयाचे स्वरूप आणि त्यांच्याबद्दलची कल्पना कालमानानुसार बदलत गेल्याचे आढळून येते. संग्रहित ज्ञान व माहिती वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रंथालयास विविध साधनांचा वापर करावा लागतो. ग्रंथालय सेवा हे त्याचे माध्यम आहे. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारीकरिता येतात. काही महत्त्वाच्या विषयाची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळता यावीत याकरिता ग्रंथालयाने ती व्यवस्थित बांधणी करून संदर्भाकरिता ठेवली आहेत. त्याचप्रमाणे काही दुर्मिळ पुस्तके, जुन्या वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या बातम्या, लेख अशा विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्ययावत माहितीकरिता ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोष, गॅझिटियर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरून नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. याव्यतिरिक्त महत्त्वाची दुर्मिळ पुस्तके, वर्तमानपत्रातील बातमी, मासिकामधील लेख अशा प्रकारचे महत्त्वाची संग्रहित केलेली साधने यांचा कागद खूप जुना होऊन ठिसूळ बनल्याने त्याची प्रतिलिपीसुद्धा काढता येत नाही याकरिता हे वाचन साहित्य भविष्यात इतरांसाठी संग्रहित करण्यासाठी त्यांना व्यवस्थितरित्या स्कॅन करून त्यांना ग्रंथालयाच्या OPC वर अपलोड केले आहे. त्यामुळे सभासदांना वाचण्यास सोयीस्कर झाले आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालयामध्ये सभासदांना सेवा जलद, अद्ययावत व अचूक पुरविल्या जाव्यात याकरिता ग्रंथालयामध्ये SLIM21 हे सॉफ्टवेअर घेतले आहे.

### ग्रंथालयाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा:

१. देव- घेव सेवा (Lending Services)
२. ग्रंथालय तालिका (Cataloguing)
३. संदर्भ सेवा (Reference Services )
४. वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services)
५. वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper Clipping Services)
६. ओपॅक सेवा (OPAC Services)
७. इंटरनेट, ई-मेल ब्राउझिंग सेवा (Online Search Services)
८. प्रचलित जागरुक सेवा (Current Awareness Service)

### ग्रंथालय तालिकेची व्याप्ती (Cataloguing)

ग्रंथालयात तालिकेचा उपयोग प्रामुख्याने ग्रंथाचे स्थान शोधण्यासाठी केला जातो. तालिकेमध्ये ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशकाचे नाव, ग्रंथाचे प्रत्यक्ष चित्र, ग्रंथाची प्रस्तावना, विषयसूची, प्रकाशन व प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे वर्ष, वर्गांक, की-वर्ड्स या आधारे कोणीही ग्रंथ शोधू शकतो.

### देव घेव सेवा (Circulation)

ग्रंथालयातील सभासदांची वर्गवारी तसेच नोंद केली जाते. प्रत्येक वाचकाचे ओळखपत्र बारकोडसहित अज्ञावालीद्वारे तयार केले जाते. ज्या वेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस तो ते ओळखपत्र ग्रंथपालास देतो. ग्रंथपाल बारकोड मशीनद्वारे त्याची पडताळणी करून नवीन ग्रंथ देतो अथवा घेतो. ही सर्व माहिती अज्ञावली लगेच समोर दाखवते. त्यानंतर गेट पास तयार होतो व वाचकाला ग्रंथ दिला जातो.

### रेफरल सेवा

ग्रंथालयांमध्ये उपलब्ध नसणाऱ्या माहितीसाठी जेथे माहिती उपलब्ध असते, अशा स्रोतांचा संदर्भ दिलेला आहे.

### करंट अवेअरनेस सर्व्हिस

ग्रंथालयातील नवीन ग्रंथ, नियतकालिके, दृकश्राव्य साधनांची यादी वाचकांसाठी अंतर्गत वेबवर प्रदर्शित केली आहे

### वृत्तपत्र कात्रण सेवा

वर्तमानपत्रे हे ज्ञानप्राप्तीचे महत्त्वाचे साधन आहे. जी माहिती ग्रंथ रूपात, नियतकालिकांतील लेखांच्या स्वरूपात प्रकाशित होण्याइतकी मोठी नसते, अशी माहिती वर्तमानपत्रातून प्रकाशित

केली जाते. वर्तमानपत्रातील बातम्यांना विषयाचे बंधन नसते. वर्तमानपत्रात प्रकाशित होत असलेल्या महत्त्वाच्या बातम्या कात्रणाच्या स्वरूपात काढल्या जातात. अशा कात्रणांचा संग्रह विषयनिहाय वेगवेगळ्या फाइलमध्ये ठेवला जातो. संशोधकाला किवा विद्यार्थ्यांना योग्य वेळी, योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती संग्रहित करून ठेवली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल तयार करण्यात आल्या आहेत. तसेच फोटोकॉपी काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आले आहे. त्यांची यादी खालीलप्रमाणे :

१. १८५७ चा इतिहास

२. हीरक महोत्सव महाराष्ट्र, २००७

३. हिंदुस्तान टाइम्स इन मुंबई,२००७ : मुंबई मेट्रो, मुंबई एअरपोर्ट, मुंबई सिटी ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट

४. मुंबईत रेल्वेवरील अतिरेकी हल्ला, ११ जुलै २००६

५. मुंबई जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ, २६ जुलै २००५

६. २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला

७. अयोध्येत राममंदिर उभारणीबाबत निकाल, २०१०

८. साहित्य संमेलन २००३-२०१०

९. पुरस्कार (२००२-२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारत रत्न, नोबेल, ज्ञानपीठ. महाराष्ट्र भूषण

१०.पुरस्कार (२००६-२००९) : महात्मा फुले समता पुरस्कार, पद्मश्री, उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार, नोबेल पुरस्कार

११. पुरस्कार (२००९-२०१२) : आल्फ्रेड नोबेल, झी गौरव, जीवन गौरव, भारतरत्न, कला गौरव, कालातिलक, महाराष्ट्र भूषण, आदर्शशिक्षक, गोदागौरव

१२. मराठा आरक्षण मोर्चा २०१७

१३. मराठा आरक्षण मोर्चा २०१८

१४. मा. अटलबिहारी वाजपेयी (१९२४-२०१८)

१५. पावसाळा २०१८

१६. वी. एस. नायपाल (नोबेल पुरस्कार विजेते)

१७. Stephen Hawking

१८. पावसाळा २०१९ (कोल्हापूर- सांगली पूर)

१९. काश्मीर कलम ३७०

२०. लोकसभा / विधानसभा निवडणूक

२१. शेतकरी आंदोलन

उपयुक्त नियतकालिके: ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारी करिता येतात. स्पर्धा परीक्षेच्या सभासदांना तसेच संशोधन करणाऱ्या सभासदांना हवी असलेली माहिती योग्य प्रकारे देण्यात येत असते. यासाठी ग्रंथालयाने काही महत्त्वाच्या नियतकालिकांची व्यवस्थितरित्या बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवली आहेत.

१) Bulletin Unique cademy

२) Pratiyogita Darpan

३) Kurukshetra

४) Yojana

५) Seminar

६) Competition Success Review

७) Economic Political Weekly

८) Science Reporter

९) पंचधारा

१०) साधना

११) सत्याग्रही विचारधारा

१२) समाजप्रबोधन पत्रिका

१३) नवभारत

१४) स्वतंत्र नागरिक

१५) चाणक्य मंडळ

१६) यशाची परिक्रमा

१७) चित्रलेखा

**संदर्भ सेवा**

विद्यार्थी सभासद, सर्वसाधारण सभासद, संदर्भ सभासद यांना काही प्रश्न उद्भवतात, त्यावेळी ग्रंथालय त्यांना संदर्भ सेवा देते. ग्रंथालयामध्ये नियतकालिक, संदर्भ ग्रंथ तसेच इतर अभ्यास विषयक ग्रंथांच्या स्वरूपात सदर सेवा दिली जाते. ग्रंथालयात उपलब्ध असलेले संदर्भ ग्रंथ, तसेच संपूर्ण ललित व ललितेतर ग्रंथांचा ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाला मुक्त वापर करण्याची परवानगी देण्यात येते. संदर्भासाठी दररोज येणाऱ्या अभ्यासकांची दैनंदिन सरासरी ७५-१०० आहे. ग्रंथालयात येणाऱ्या संशोधक, अभ्यासक व साहित्यिकांना मागणीनुसार

ग्रंथालयातील किंवा अन्य ग्रंथालयातून आंतरग्रंथालयीन देवघेवीअंतर्गत संदर्भसेवा दिली जाते. आजच्या बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयीन सेवा सुविधांचे स्वरूप बदलेले आहे. विद्यार्थी सभासद, सर्वसाधारण सभासद, संदर्भ सभासद, संशोधक सभासद यांच्यासाठी Online e-resources उपलब्ध करून दिले आहेत.

१) **DOJ (Directory of Open Access Journals)**

'डिरेक्टरी ऑफ ओपन अक्सेस जर्नल्स,' यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, मेडिकल सायन्सेस, सामाजिक शास्त्रे आणि मानव्य विज्ञान या विषयांच्या ओपन सोर्स नियतकालिकांचा समावेश केला आहे. या सर्व नियतकालिकातील लेख ऑनलाईन उपलब्ध असून ते वाचकांना डाऊनलोड करता येतात.

या डिरेक्टरीमध्ये लेखाच्या शीर्षकानुसार, विषयानुसार, लेखकानुसार, की-वर्डनुसार लेखांचा शोध घेता येतो.

२) **INFLIBNET (Information & Library Network)**

इन्फ्लीबनेट यामध्ये शोधगंगा (प्रबंधाचा पूर्ण सहित डेटाबेस), शोधगंगोत्री(ज्या संशोधकांची भारतातील विविध विद्यापीठांमध्ये PhDच्या संशोधनासाठी नोंदणी झालेली आहे अशा संशोधकांच्या त्यांनी निवडलेल्या विषयाचा गोषवारा याचा डेटाबेस, रिसर्च प्रोजेक्ट डेटाबेस उपलब्ध आहे.

३) **E-PGpathshala**

या प्रकल्पाअंतर्गत ई-अध्ययन (e-dhyayan), युजीसी मुक्स (UGC Moocs), आणि ई-पाठ्य (e-Pathya) हे तीन कार्यक्रम राबवले जातात. ई-पाठ्य या कार्यक्रमांतर्गत विविध विषयावरील अभ्यसक्रमाशी निगडीत वाचन साहित्य मोफत उपलब्ध करून दिले आहे.

४) **National Digital Library of India**

National Digital Library of India हा मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकारचा उपक्रम आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय डिजिटल ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेले मेटाडेटा, पूर्ण संहिता, निर्देश व डिजिटल वाचन साधने उपलब्ध करून देणे हा आहे.

त्याचप्रमाणे खालीलप्रमाणे **e-resources** ॲक्सेस प्राप्त आहेत.

1. Shodhganga : http://shodhganga.inflibnet.ac.in/
2. DRT-Europe : http://www.dart-europe.eu/basic-search.php
3. LSE Theses Online http://etheses.lse.ac.uk/view/sets/DEPTS.html
4. DSpaceCambridge https://www.repository.cam.ac.uk/
5. NDLTD http://search.ndltd.org/index.php
6. Open Thesis http://www.openthesis.org/
7. Dyuthi Digital Repository http://dyuthi.cusat.ac.in/xmlui/
8. USU Institutional Repository: http://repository.usu.ac.id/handle/123456789/21
9. KrishiKosh (कृषिकोष) : http://krishikosh.egranth.ac.in/
10. EThos: e-theses online servicehttp://ethos.bl.uk/ProcessSearch.do
11. ISIM Dissertations https://openaccess.leidenuniv.nl/handle/1887/4948
12. Open AccessTheses and Dissertations https://oatd.org/
13. Shodhgangotri http://shodhgangotri.inflibnet.ac.in/

## ग्रंथालयाचे नियम:

- **वर्गणी**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहेः

१. **सर्वसाधारण सभासदत्व:**

सर्वसाधारण सभासदाकरिता रु. ५०० वार्षिक वर्गणी तसेच रु. ५०० अनामत रक्कम.

सभासदाला एकावेळी एक पुस्तक/ ग्रंथ देण्यात येईल.ते ८ किंवा १५ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किमतीएवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल.

२. **विद्यार्थी सभासदत्व:**

महाविद्यालयीन/ उच्चशिक्षण/ संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नाममात्र वर्गणी वार्षिक रु. ५० व अनामत

रक्कम रु.१००.

यशवंतराव चव्हाण ग्रंथलायामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून फक्त एका आठवड्याकरिता रु.५० फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डावर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेता येते.

माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीत शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता वेगळी फी आकारली जात नाही.

३. **संयुक्त संस्था सभासदत्व** (Corporate Membership):
कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणाऱ्या संस्था या सभासदत्वासाठी ५ वर्षासाठी एकरकमी रु. ५०,०००.
अनामत रक्कम : सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही. परंतु, एखाद्या दुर्मिळ वा किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी अनामत रक्कम घेण्यात येईल.
एका वेळी देण्यात येणारी पुस्तके: एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

४. **संस्था सभासदत्व :**
यासाठी शिक्षण वा संशोधन संस्था वा सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण वा संशोधन संस्था ही यु.जी.सी., आय.सी.एस.एस.आर. किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यताप्राप्त असावी. सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यताप्राप्त अधिघोषित विद्यापीठांनी मान्यता दिलेली असावी.
संस्था सभासदत्वासाठी : प्रवेश फी १,००० रुपये ना परतावा
वार्षिक वर्गणी : ५,००० रुपये
दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद : एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी २०,००० रुपये.
एकावेळी देण्यात येणारी पुस्तके: एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. अ व ब नुसार सभासदत्व हे सबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्याच्यावतीने पुस्तके घेण्यास/ प्रत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखाची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

५. **महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक**
यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/ संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही.

- **ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या:**
सकाळी ११.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत ग्रंथालय वाचकांकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी उघडे राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय सुरू राहील.

- **सभासदाचे कार्ड हरविल्यास**
त्यांना पुस्तक देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वतःच्या हस्ताक्षरात अर्ज करून ग्रंथालयास सादर करावा. त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

- **सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास**
त्यांनी १५ दिवसात नवीन खरेदी करून द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाच्या अद्ययावत मूल्याइतकी रक्कम अनामत रकमेतून कमी करण्यात येईल. गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रकमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

- **ग्रंथालयामध्ये शांतता राखावी**
सभासदांनी आपसात किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करणे, धूम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई राहील. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावेत.

- **ग्रंथालयातून बाहेर पडताना**
सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखलअंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

- **सभासदास ग्रंथालयाचे सभासद राहावयाचे नसल्यास**
त्यांनी तसा लेखी अर्ज द्यावा, त्यासोबत कार्ड परत करावे. त्यावर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी वजा करण्यात येईल. ❖

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

**ऑगस्ट २०२० ते फेब्रुवारी २०२१**

फेब्रुवारी २०20 उगवला आणि नवीन PG DC बॅचचे ९७ विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीत हजर झाले. कोर्स सुरू झाला. मुलांना वेगवेगळ्या टेक्नॉलॉजीवर शिक्षण सुरू झाले आणि महिनाभरातच कोविडचे संकट पुढ्यात उभे राहिले. आदेशानुसार, कोर्स अस्थायीपणे स्थगित करण्यात आला.

वेळ जसजसा पुढे सरकत होता, तसतसे मुलांचे होणारे नुकसान दिसत होते. C-DAC व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानसारखेच C-DAC चे Authorized Training Centres (ATCs) या बाबतीत निर्णय घेण्यास पुढे सरसावले.

जुलै अखेरीस हीच बॅच ऑनलाईन सुरू करण्याचा निर्णय झाला. विद्यार्थ्यांसोबत या विषयावर अनेकदा चर्चा झाली. वेळ फुकट जात असल्याने त्यांनाही प्लेसमेंट म्हणजेच कोर्सनंतरची नोकरी मिळण्याच्या शक्यतेवर शंका येत होत्या. विद्यार्थ्यांच्या पालकांना ऑनलाईन होणाऱ्या कोर्सबद्दल मनात भीती होती, अभ्यासक्रम व्यवस्थित पार पडेल की नाही याबद्दल शंका होत्या. विद्यार्थ्यांना, आपण ही खात्री करून दिली की ऑनलाईन पद्धतीनेही आपण हा कोर्स उत्तमरित्या पूर्ण करू.

या निर्णयासोबतच विद्यार्थ्यांना १५% फी परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. या रिफंडमधून विद्यार्थ्यांना घरी कोर्स प्रणालीची मांडणी करण्यास मदत झाली. उदा: लॅपटॉप, इंटरनेट सेवा वगैरे.

कोर्स ऑनलाईन असल्याने प्रशिक्षकाचा कुठेही स्थाईक असण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रशिक्षक उपलब्ध करून देणे शक्य झाले. त्यांची दररोजची होणारी ऑनलाईन सत्र निरीक्षणे पाहिली जात होती, हजेरी नियमितपणे घेतली जात होती. कॉम्प्युटर लॅबोरेटरीमधील सराव ऑनलाईन घेत होतो आणि मुले करतही होती. पण, येथे मात्र आम्हाला कमतरता जाणवल्या. विद्यार्थी प्रत्यक्ष पुढ्यात असताना त्यांचा अभ्यास घेणे आणि ऑनलाईन बसून घेणे या पद्धतीमध्ये प्रशिक्षक म्हणून समाधान मिळाले नाही. तरीही, होणारा प्रयत्न कमी झाला नाही.

फेब्रुवारी २०२१ मध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षा ऑनलाईन असल्या तरी त्याला कठोर पर्यवेक्षणाची जोड होती. आतुरता होती ती त्यांच्या अंतिम निकालाची. या पद्धतीने केलेले हे पहिलेच प्रशिक्षण होते. त्यामुळे हा निकाल जितका मुलांचा होता, तितकाच प्रबोधिनीचाही होता. राष्ट्रीय पातळीवर निकाल जाहीर झाला आणि प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांमध्ये एकच जल्लोष झाला.

प्रतिष्ठानच्या प्रबोधिनीचा विद्यार्थी JV Technology या प्रणालीमध्ये भारतात पहिला आला. आपले इतरही काही विद्यार्थी उच्चांक यादीमध्ये असल्याचे समजले. भरघोस मार्क मिळवून उत्तीर्ण झालेले आपले विद्यार्थी आता प्लेसमेंटच्या मैदानात उतरले आहेत. तिथेही त्यांची कीर्ती उज्ज्वल होत असल्याचे कळते.

वरील PG DC कोर्स सोबत आपण MKCL चे अभ्यासक्रमसुद्धा ऑक्टोबर २०20 पासून प्रबोधिनीमध्ये सर्व काळजीनिशी सुरू केले. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. जसजशी कोविडच्या संकटाची तीव्रता कमी होत जाईल, तशी प्रबोधिनीच्या यशात वाढ होत जाईल याची प्रबोधिनीला खात्री आहे. ❖

# विभागीय केंद्र, नांदेड

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या नांदेड विभागीय केंद्र नांदेडच्यावतीने आदरणीय यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवाजी अंबुलगेकर, भारत होकर्णे, शिवानंद सुरकुटवार, नेहरू युवा केंद्राच्या चंदा रावळकर, पंडित पाटील बेरळीकर, कुलदीप मुळी, पंजाब आडकीने व विभागीय केंद्राचे सचिव शिवाजी गावंडे उपस्थित होते. ❖

# विभागीय केंद्र, नाशिक

## कोविड रुग्णांसाठी पुस्तकांची अनोखी भेट

''कोविड-१९ रुग्णांसाठी सेवाभावी जाणिवेतून मदत करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था या प्रशासनाच्या प्रयत्नांना ऊर्जा देत असून त्यातून बळ मिळत आहे. त्यामुळे ही लढाई सहज जिंकू. समाजाचं दुःख, हे आपल्या जवळच्या व्यक्तीचे आहे. आणि त्या जाणिवेतून अनेक सेवाभावी संस्था, व्यक्ती या प्रशासनाचा मदतीचा हात झाल्या आहेत. त्यातूनच कृतीशील कार्याचे योगदान मिळत आहे. हे दिलासा देणारे आहे. सर्व जनतेने सुरक्षेविषयक नियमांचे पालन करावे आणि कोविड रोखण्यासाठी सहकार्य करावे. विश्वास ग्रुपसारख्या संस्था या कामी पुढाकार घेत आहेत हे अभिनंदनीय आहे,'' असे प्रतिपादन नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी केले. विश्वास ग्रुप व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, ग्रंथ तुमच्या दारी यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या कोविड हॉस्पिटलमध्ये ३०० पुस्तके भेट देण्यात आली. त्याप्रसंगी श्री. गमे यांनी हे विचार व्यक्त केले. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी या कामी पुढाकार घेतला आहे.

यावेळी बोलताना श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, कोविड हे आपल्या सर्वांवर आलेले संकट असून ते दूर करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा. सोशल डिस्टन्सिंग बरोबरच मनाचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही. त्यामुळे मन आनंदी राहण्यासाठी मदत होईल. महानगरपालिकेतर्फे जनतेसाठी आरोग्यसुविधा तातडीने उपलब्ध होत आहेत हे निश्चितच सर्वसामान्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे आहे. यावेळी ग्रंथ तुमच्या दारी चे शिल्पकार विनायक रानडे उपस्थित होते. विश्वास ग्रुपतर्फे सातत्याने आरोग्यविषयक व समकालीन प्रश्नांचा वेध घेणाऱ्या घटनांवर वेळोवेळी सामाजिक जाणिवेतून उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

## वाचन प्रेरणा दिन

## मुलांनी उच्च ध्येयाने प्रेरेत होऊन ज्ञानसाधना करावी – विश्वास ठाकूर

आजच्या सोशल मीडियाच्या जगात वाचन कमी होतेय का, वाचन संस्कृती कमी होतेय का, यावर उत्तर म्हणजे पुस्तकांचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे आणि त्यातून चांगला माणूस घडवणे. मुलांनी उच्च ध्येयाने प्रेरेत होऊन ज्ञानसाधना करावी व समाजासाठी आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांनी केले.

माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून ग्रंथ तुमच्या दारी, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व यशवंतराव चव्हाण ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त नाशिक महानगरपालिका शाळा क्र. १८ आनंदवल्ली येथील मुलींसाठी पुस्तकांची भेट विश्वास ठाकूर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. सदर कार्यक्रम विश्वास को-ऑप. बँक लि., सावरकरनगर येथे संपन्न झाला. पुस्तकांच्या सहवासात ज्ञानाबरोबरच जगण्याचा आनंदही मिळत असतो आणि ती मौल्यवान ठेव असते. तो एक जीवनमार्ग आहे. विद्यार्थ्यांनी महापुरूषांच्या चरित्रांचे वाचन करावे व सकारात्मक विचारांची जोपासना करावी असेही ते म्हणाले.

याप्रसंगी ग्रंथ तुमच्या दारीचे शिल्पकार विनायक रानडे, विश्वास को-ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील, बिकास सुराणा, विशाल वाणी, मुख्याध्यापिका कुंदा बच्छाव तसेच विद्यार्थीनी शीतल ठाकरे, राणी रणबावळे, स्वाती राजगुरू, सोनाली साह आदि उपस्थित होते. पुस्तकांची ही भेट मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवून गेली.

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ग्रुप, नाशिक आयोजित खुल्या ऑनलाईन काव्यस्पर्धेचा निकाल जाहीर

बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाचा, जीवनशैलीचा कोविड-१९ चा प्रादुर्भाव, त्याचबरोबर प्रेमाचं, भावभावनांचं प्रतिबिंब, शेतकऱ्यांच्या दुःखाचं आणि चिंतन करणाऱ्या कवितांनी बहर कवितेच्या ऑनलाईन काव्यस्पर्धेत कवींनी आपल्या प्रतिभेचे दर्शन घडविले.

सदर स्पर्धेकरिता महाराष्ट्रातील मुंबई, चंद्रपूर, रायगड, कोल्हापूर, बुलढाणा, पुणे, अहमदनगर, गडहिंग्लज, नांदेड, सोलापूर, अकोला व नाशिक अशा विविध ठिकाणांहून स्पर्धकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला व वैशिष्ट्यपूर्ण कवितांनी स्पर्धे ची गुणवत्ता वाढविण्यास मदत केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

स्पर्धेतील विजेते :

१. प्रथम क्रमांक : (आयुष्याची जीवनगाथा) श्वेता अजय पाटील, धुळे, रुपये २००१ व प्रमाणपत्र कवितेचे नाव :
२. द्वितीय क्रमांक : (हे नारी) सायली रविंद्र पवार, साक्री, जि.धुळे, रुपये १५०१ व प्रमाणपत्र
३. तृतीय क्रमांक : (मुंबईचे आत्मगीत) तेजस्वी रवींद्र महाडिक, नवी मुंबई, रुपये १००१ व प्रमाणपत्र
४. उत्तेजनार्थ क्र. १ : (सृष्टीचे नंदनवन करण्या) सुनील म्हसकर, शहापूर, जि. ठाणे रुपये ५०१
५. उत्तेजनार्थ क्र. २ : (आई) आस्था शालिकराम घरडे, चंद्रपूर, जि. चंद्रपूर, रुपये ५०१
६. उत्तेजनार्थ क्र. ३ : (अवकाश) श्रद्धा निगडे, मुलुंड, मुंबई, रुपये ५०१

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर, सचिव डॉ.कैलास कमोद, कोषाध्यक्ष डॉ.सुधीर संकलेचा, सदस्य सौ. कविता कर्डक, रऊफ पटेल, ॲड. नितीन ठाकरे, डॉ. स्मिता मालपुरे-वाकेकर, सौ. ज्योती पावरा आदिंनी अभिनंदन केले आहे.

## यशवंतराव चव्हाण यांचे विचार मूलभूत आणि दिशादर्शक - डॉ. स्वप्नील छाया विलास चौधरी

''महाराष्ट्राचे थोर शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जीवनकार्य, विचार महाराष्ट्राच्या समृद्ध विकासासाठी दिशादर्शक व प्रेरणादायी ठरले आहेत. सुसंस्कृत नेता आणि समाजाविषयी तळमळ या गोष्टींचा संगम यशवंतरावांच्या जीवनप्रणालीत होता. त्यामुळेच लोकनेता व सर्वसामान्यांच्या जीवन जाणिवांचे भान असलेला कृतीशील समाजकारणी म्हणून त्यांच्याकडे आपल्याला पहावे लागेल. साहित्य, कला, कृषि, शिक्षण, क्रीडा अशा विविध क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य आदर्शवत व तितकेच मूलभूत आहे,'' असे प्रतिपादन डॉ.स्वप्नील छाया विलास चौधरी (राहुरी) यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, सारस्वत बँक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अँण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला फेसबुक लाईव्ह 'यशवंतगाथा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी घटनांची, संघर्षाची, तात्विक आचरणाची, साधेपणाची, सुसंस्कृत विवेकी विचारांच्या राजकारणी व्यक्तीची 'जीवनगाथा' या कार्यक्रमातून त्यांनी मांडली. काळाला पुरून उरणारे कार्य आणि त्यातून समाजाची जडणघडण कशी होते, याचेच हे दर्शन होते. यशवंतरावांची दुर्मीळ छायाचित्रे जिवंत अनुभूती देणारी होती.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करताना प्रतिष्ठानच्या नाशिक विभागीय केंद्राचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, ''नव्या पिढीपर्यंत स्व. यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्य पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. युवकांना जास्तीत जास्त समाजकारणात यावे आणि विधायक कार्यातून समाजसेवा करावी. आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा वापर लोकाभिमुख, लोकोपयोगी कार्यासाठी करणे काळाची गरज आहे, तोच विचार स्व. यशवंतरावांचे राहिलेले स्वप्न पुरे करेल.''

# विभागीय केंद्र, ठाणे

माहे ऑगस्ट २०२० ते डिसेंबर २०२० मध्ये शासनाच्या नियमानुसार कुठलेही सभागृह उपलब्ध नसल्याकारणाने नियोजित कार्यक्रम घेता आले नाहीत.

**विचारकुंकू**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे व रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जानेवारी २०२१ रोजी 'विचारकुंकू' हा कार्यक्रम ठाणे नगर वाचनमंदिर कोर्ट नाका, ठाणे येथे सौ. वासंती वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. डॉ. निर्मोही फडके यांनी त्यांची मुलाखत घेतली.

सौ. वर्तक यांच्या मुलाखतीनंतर सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रगतिशील शेतकरी सौ. माधुरी भोईर, लहान मुलांसाठी काम करणाऱ्या सौ. शुभदा विद्वांस, दूरदर्शनच्या सौ. उमा दीक्षित, 'यशस्वी ब्युटीपार्लर'च्या सौ. माधवी चितळे, नृत्यांगना सौ. कविता कोळी, संगीत क्षेत्रातील सौ. अपूर्वा गोखले आणि कोविड काळात अविरत काम करणाऱ्या परिचारिका सौ. संगीता जाधव या सात महिलांचा सत्कार अध्यक्षांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम शासनाने घालून दिलेल्या नियमांनुसारच पार पडला. ❖

# विभागीय केंद्र, नवी मुंबई

कोरोना महामारीच्या संकटामुळे केंद्रामार्फत या कालावधीत उपक्रम घेता आले नाहीत, कार्यकारिणीची सभाही झुमद्वारे ऑनलाईन घेण्यात आली.

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०२० रोजी नवी मुंबई केंद्रातर्फे ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळ या संस्थेतील यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार रुपये १५ हजार व मानपत्र या स्वरूपात समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. कोरोना महामारीमुळे हॉलमध्ये एकाआड एक आसनावर बसलेल्या मोजक्या पन्नास-साठ सदस्यांच्या उपस्थितीत केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री. अरविंद वाळवेकर यांना पुरस्कार प्रदान केला. यावेळी व्यासपीठावर केंद्राचे सचिव डॉक्टर अशोक पाटील नवी मुंबई महानगरपालिका सभागृह नेता रवींद्र इथापे इत्यादी उपस्थित होते. अमरजा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉक्टर अजित मगदूम यांनी आभार मानले.

**वैद्यकीय वस्तू व उपकरणे घेण्यासाठी अनुदान**

ज्येष्ठ नागरिक संघाच्या रुग्ण सेवा केंद्रात वैद्यकीय वस्तू व उपकरणे घेण्यासाठी नवी मुंबई केंद्रातर्फे एक लाख रुपये अनुदान देण्यात आले. रुग्ण सेवा केंद्रातर्फे सभासदांना अल्पदराने व्हील-चेअर, वॉटर बेड, नेब्युलायझर यासारखे साहित्य गरजेस्तव दिले जाते. ❖

# विभागीय केंद्र, उस्मानाबाद

## वैचारिक, नैतिक वारसा जपणारा नेता म्हणजे खासदार पवार

वैचारिक व नैतिक वारसा जपत मातृभूमीवर श्रद्धा ठेवून महाराष्ट्राचा व देशाचा विकास करणारा नेता म्हणजे खासदार शरद पवार होत, असे प्रतिपादन प्रा. ए.डी. जाधव यांनी केले. ते 'शरद पवार एक द्रष्टा नेता,' या विषयावर व्याख्यानात बोलत होते.

उस्मानाबाद येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये खासदार पवार यांच्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी अध्यक्षस्थानी जीवनराव गोरे, प्रमुख पाहुणे धनंजय पाटील होते.

पुढे बोलताना प्रा. जाधव म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज व द्रष्ट्या नेत्याची माहिती उस्मानाबादमध्ये व्याख्यानात दिली जाते. एखादा आमदार, मुख्यमंत्री वा संसदपटू अशा नेत्यासाठी नागरिकांकडून मोजपट्टी लावली जाते. खासदार पवार यांचे राजकारणात गेल्या ५० वर्षात वैचारिक व कार्यशील राहण्याचे सातत्य महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. खासदार पवार यांचे नेतृत्व घराघरात व लहान मुलांपर्यंत पोहचलेले आहे. यास्तव त्याचे महत्त्व ठळकपणे नजरेत भरते. सत्तेच्या माध्यमातून विकास साधणारे व्यक्तिमत्व अशीही त्यांची ओळख आहे. खासदार पवार यांचा शेतीसंदर्भातील १९७२ च्या दृष्काळापासून आजपर्यंतचा प्रवास नजरेत भरणारा आहे. राज्यात आर्थिक समृद्धी आणण्याची प्रक्रिया सुरू झाली ती यशवंतराव चव्हाणांपासून. या प्रक्रियेस पुढे नेण्याचे काम खासदार पवार यांनी अखंडपणे केले. यशवंतराव चव्हाण हे त्यांचे गुरू. गुरूच्या पुढे जाऊन शिष्याने काम केले, हे महाराष्ट्रात पहिले उदाहरण आहे. केंद्र सरकारच्या नवीन कृषी कायद्याबाबत जनतेसमोर जाऊन चर्चा करण्याची मागणी प्रथम खासदार पवार यांनी केली होती. महाराष्ट्रात लोकशाही वाढविण्याचे काम यशवंतराव चव्हाणांनंतर खासदार पवार यांनी केले. जातीपातीच्या राजकारणापुढे जाऊन त्यांनी राजकारण केले. लोकशाहीचे विद्रुपीकरण होवू नये म्हणून जाणतेपणाचे काम खासदार पवार यांनी महाराष्ट्रात केले. त्याच्यासाठी सातत्याने ते झगडत राहिले.

खासदार पवार यांचा स्वभाव म्हणजे कोणावर कधीही कर्कशपणे ओरडणारे असे दर्शन महाराष्ट्राला कधीही झाले नाही. संयमाने व व्यवस्थित बोलणारा, घटनेवर विश्वास असणरा असा हा नेता आहे. सत्ता असताना व नसताना देखील घटनेचा आधार घेऊन त्यांनी महाराष्ट्रात काम केले. त्यांचा प्रत्येक निर्णय मुख्यमंत्री, संरक्षण मंत्री असतानाही एकतर्फी कधीही झाला नाही. लोकांकडून मते मागवून सहमतीने निर्णय घेतला जात असे. याचबरोबर पक्षाबाहेर जाऊन सर्व पक्षीयांशी चांगले संबंध ठेवणारे नेतृत्व म्हणजे खासदार पवार. एखादा कोणत्या पक्षाचा आहे त्यापेक्षा त्याचे कर्तृत्व माहीत असल्याने ते सर्वांना भेटतात. खासदार पवार यांचे सबंध सर्वच पक्षाच्या नेत्यांबरोबर होते. प्रमोद महाजन, उद्धवराव पाटील यांचे समवेत त्यांचे घनिष्ठ संबंध होते.

मित्रत्व कसे असावे याचे उदाहरण म्हणजे शेकापचे आ. माणिकराव खपले यांचे. कोणाच्याही स्वागताला ते तुळजापूरमध्ये कधीही गेले नाहीत. परंतु देवीदर्शनाला खासदार पवार आले, की खपले त्यांच्या स्वागताला जात असत. त्यामुळे राजकारणातही मैत्रीचे नाते जपणारे खासदार पवार आहेत, असे खपले सांगायचे. गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख यांच्या मैत्रीचे महाराष्ट्रात नाव घेतले जाते. अनेक वेळेस विरोधी पक्षाचा नेता विजयी झाल्यानंतर त्यांचे स्वागत करून हे नेतृत्व पुढे आणले गेले आहे. जिवाला जीव देणारे जे तत्त्व खासदार पवार यांचे आहे. कायम निवृत्ती व कायम भरती या तत्वाला अनुसरून यशवंतराव काम करायचे. हेच तत्व खासदार पवार पार पाडत आहेत.

आर. आर. पाटील यांच्यासारखे खेड्यापाड्यातून आलेले नेतृत्व खासदार पवार यांनी निर्माण केले. सत्तेचा अमरपट्टा कोणीही घेऊन येत नाही. राजकारणात सत्ता येते-जाते परंतु, त्यात सातत्य ठेवणे, सुटी न घेणे हा प्रकार खासदार पवार यांनी केला आहे. सातत्याने त्यांनी राज्यात नेतृत्वाची फळी तयार करून त्यांना ताकद पुरवली. हे काम त्यांनी प्रत्येक क्षेत्रात केले.

## स्व.यशवंतराव चव्हाण हे तत्वनिष्ठ राजकारणी होते – प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख

स्व.यशवंतराव चव्हाण यांचं व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा विकास व्हावा व सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी त्यांनी राज्यात सहकार चळवळ वाढवली व कृषी क्षेत्राचा विकास करतानाच मराठवाड्याचे मागासलेपण पुसण्यासाठी व बहुजनांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी आश्रम शाळांनाही प्राधान्य देऊन दुर्बल घटकापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगोत्री पोहचवली. पूर्णा योजनेतून त्यांनी मराठवाड्याचा विकास केला.

सामान्य माणसात मिसळणारे व माणसावर प्रेम करणारे ते नेते होते. ते तत्वनिष्ठ राजकारणी होते असे प्रतिपादन, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ब स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने २५ नोव्हेंबर रोजी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या स्मृतिदिनी आयोजित केलेल्या 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान,' या विषयावर बोलताना प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख (तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर) यांनी केले. अध्यक्षस्थानी अरविंद गोरे (चेअरमन- डॉ.बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना, केशेगाव हे होते. यावेळी प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख, स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र उस्मानाबादचे सचिव बालाजी तांबे,कोषाध्यक्ष सुदेश टेकाळे,समन्वय सदस्य संतोष हंबिरे (संपादक दै.संघर्ष), भा.न.शेळके, धनंजय पाटील, सुरेखा जगदाळे, किरण निंबाळकर, डॉ.तुमसुम सय्यद, शाहुराज घोगरे आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख मान्यवरांनी स्व. यशवंतराव चव्हाण व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमांचे पूजन केले. प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख म्हणाले, स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई हे अनेक वर्षापासून यशवंतराव चव्हाण यांचे विचार नव्या पिढीला माहीत व्हावे म्हणून कार्य करत आहे. नुकतीच उस्मानाबादला विभागीय शाखा सुरू झाली आहे. प्रतिष्ठानचा हा पहिलाच उपक्रम आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात स्व.यशवंतराव चव्हाण यांचेच योगदान होते. त्यांच्यामुळेच बहुजन समाजाला शिक्षण मिळाले.

ते म्हणाले, यशवंतराव चव्हाण हे जसे तत्वनिष्ठ राजकारणी होते तसेच ते साहित्यिक, नाट्यरसिक आणि समीक्षकही होते. त्यांनी तमाशाला लोकनाट्य नाव दिले व तमाशा कलाकारांना सन्मान दिला. त्यांचे अनेक साहित्यिकांसोबत मैत्रीचे संबंध होते. त्यांनी साहित्यिकांना मानसन्मान दिला. यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण यांचे लेखक रणजित देसाई, शिवाजी सावंत, ना. धों. महानोर, पु. ल. देशपांडे यांच्याबरोबर कसे संबंध होते या विषयावरचे अनेक किस्से त्यांनी रसिकांना सांगितले.

यशवंतराव चव्हाण म्हणजे विचारांचा वाहता झरा होता. महाराष्ट्राच्या राजकारणातला कोहिनूर म्हणजे यशवंतराव चव्हाण होते. आजही त्यांचे विचार आत्मसात केले तर महाराष्ट्र राज्याची प्रगती होईल. आजच्या पुढाऱ्यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या तत्वनिष्ठ राजकारणाचा आदर्श घ्यावा, असे त्यांनी शेवटी आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करताना श्री. अरविंद गोरे म्हणाले की यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ राबवली. म्हणूनच तेरणा सहकारी साखर कारखाना मराठवाड्यात पहिल्यांदा निघाला. आज यशवंतराव यांच्यासारखं तत्वाचं राजकारण राहिलं नाही. त्यामुळे पुन्हा सत्ताकेंद्रित हुकुमशाहीसारखं राजकारण संपूर्ण जगात होऊ लागलं आहे. आणि म्हणून यशवंतराव चव्हाणांसारखं तत्वनिष्ठ राजकारण होणं गरजेचं आहे.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी शारीरिक अंतराचे नियम पाळून उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ. केशव क्षीरसागर यांनी केले तर आभार बालाजी तांबे यांनी मानले.❖

# विभागीय केंद्र, कराड

## स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३६ वी पुण्यतिथी

स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२० रोजी 'प्रीतीसंगम' या साहेबांच्या समाधीस्थळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी पुष्पचक अर्पण केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष तसेच सहकार व पणन मंत्री ना. बाळासाहेब पाटील, गृहराज्यमंत्री श्री. सतेज पाटील, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण, खासदार श्री. श्रीनिवास पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, कराड येथे श्री. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथे ना. अजितदादा पवार व ना. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते यशवंतरावजी चव्हाण व सौ.वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते.

## सन्मानीय खासदार श्रीनिवासजी पाटील यांची सदिच्छा भेट

सन्माननीय खासदारश्रीनिवासजी पाटील यांनी १९ जानेवारी २०२१ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र-कराड येथे सदिच्छा भेट देऊन यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. यावेळी विभागीय केंद्र कराडचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे, श्री.सारंग पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

## खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांची सदिच्छा भेट

खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांनी शुक्रवारी २२ जानेवारी २०२१ रोजी स्व.यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या 'प्रीतीसंगम' या समाधीस्थळी जाऊन पुष्पचक अर्पण केले व चव्हाण साहेबांना आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, कराड येथील 'विरंगुळा' या बंगल्याला भेट दिली. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. डॉ.प्रज्ञाताई पवार, श्री.दत्ता बाळसराफ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सदस्य श्री.नंदकुमार बटाणे व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन

स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगळवार दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र- कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही ठिकाणी कराड केंद्राचे व सौ.वेणूताई चव्हाण स्मारकाचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या कार्यकमासाठी दोन्ही संस्थांचे सर्व कर्मचारी तसेच सौ. वेणूताई चव्हाण स्मारक अभ्यासिकेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## स्व. सौ.वेणूताई चव्हाण ९५वी जयंती

यशवंतरावजींच्या राजकीय जडण-घडणीमध्ये मातोश्री ती. विठामाता यांच्याप्रमाणेच सौ. वेणूताईंचा अग्रकमाने वाटा होता. वेणूताईंच्या ९५ व्या जयंती दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र- कराड येथे सौ.वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सदस्य श्री.नंदकुमार बटाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच सौ.वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल येथील स्व.यशवंतराव चव्हाण व सौ.वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सर्व कर्मचारीवर्ग व अभ्यासिकेतील विद्यार्थीवर्गही उपस्थित होता.❖

# विभागीय केंद्र, जळगांव

## बहुभाषिकत्व, वैज्ञानिक वृत्तीची जोपासना, कम्युनिटी महाविद्यालय संकल्पना रुजणार

कोरोना संक्रमण काळात जनजीवन विस्कळीत झाले. शिक्षण क्षेत्रावरही त्याचा मोठा परिणाम झाला आहे. भविष्यात शिक्षण आणि आरोग्यावर जास्त लक्ष केंद्रित करावे लागेल. केंद्र सरकारने नुकत्याच मंजूर केलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुभाषिकत्व वैज्ञानिक वृत्तीची जोपासना, कम्युनिटी महाविद्यालय संकल्पना रुजण्यास मदत होईल, असा सूर ऑनलाइन परिसंवादातून निघाला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई संचलित जळगाव जिल्हा केंद्रातर्फे सोमवारी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित परिसंवाद वेबिनारवर घेण्यात आला. त्यात बालभारती मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉक्टर जगदीश पाटील, प्राध्यापक डॉक्टर मनिषा जगताप यांनी संवाद साधला. सर्वांसाठी उच्च दर्जाचे शिक्षण देणारी शिक्षण प्रणाली विकसित करणे, भूमिका, जबाबदारी, अधिकार, कर्तव्ये, संविधानात्मक मूल्यांप्रति आदरभाव, कौशल्ये, मूल्ये व वृत्तीची जोपासना करून जागतिक नागरिकत्वाची घडण हे नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे ध्येय आहे, असा मुद्दा 'बालभारती' सदस्य डॉक्टर जगदीश पाटील यांनी मांडला. मागील दोन्ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा आढावा घेऊन नवीन धोरणाची ध्येये, वैशिष्ट्ये सांगितली. प्रवेश, नवीन शैक्षणिक रचना, पायाभूत शिक्षण, अभ्यासक्रम, मूल्यमापन, बहुभाषिकत्व याविषयी कस्टम आणि मिशनद्वारे सादरीकरण केले. विविधता व स्थानिक परिस्थिती, समता, सर्वसमावेशकता, सामाजिक सहभाग, आकलनावर भर, क्षमतांची बांधणी, चिकित्सक विचार व सर्जनशीलता ही या धोरणाची वैशिष्ट्ये आहेत. सार्वत्रिक प्रवेशात औपचारिक, अनौपचारिक शिक्षण, अध्ययन निर्मिती, शाळाबाह्य मुले, एकविसाव्या शतकातील कौशल्ये, भाषा शिक्षणातील अडथळे दूर करणे अर्थात मातृभाषेतील शिक्षणावर भर यांचा समावेश आहे. जिज्ञासा निर्माण करणे, कला, हस्तकला, संगीत, निसर्गाशी नाते, रंग, आकार, मुळाक्षरे व संख्या, सांघिक कार्य, खेळावर आधारित शिक्षण, वर्तन या गोष्टींचा पायाभूत शिक्षणात समावेश आहे, असे ते म्हणाले.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, क्रमिक पाठ्यपुस्तके, शिक्षकांसाठीच्या पूरक सामग्रीचा समावेश या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे. अभ्यासक्रम कमी करणे, चिकित्सक विचार, आंतरक्रिया यांवर भर, अनुभवात्मक शिक्षण, विषयांचे एकात्मीकरण करणे, डिजिटल साक्षरता, वैज्ञानिक वृत्तीची जोपासना, बहुभाषिकत्वाला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करणे या घटकांचा अभ्यासक्रमात समावेश राहणार आहे.

### राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण मंडळही अस्तित्वात येणार

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्राध्यापक डॉक्टर मनीषा जगताप यांनी मागील धोरणांचा आढावा घेऊन नवीन शैक्षणिक धोरणात झालेले बदल सांगितले. समाजाभिमुख व कौशल्यावर आधारित उच्च शिक्षण देऊन रोजगार निर्मितीच्या दृष्टीने पाऊलवाट निर्माण होईल, नवीन धोरणाने शैक्षणिक विकास व विविध रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील, हे त्यांनी मांडले. दोन वर्षात किमान डिग्री निश्चित केली जाईल. शैक्षणिक पात्रतेनुसार एक ते चार वर्षांची ती असेल. एमएनंतर एक वर्ष इंटरमिजिएट, इंटरमीजिएटनंतर चार वर्षे असेल. शैक्षणिक धोरणात सन २०२२ पर्यंत या मापदंडानुसार नॅशनल कौन्सिल फॉर प्रोफेशनल स्टँडर्ड म्हटले जाईल. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जागी आता 'राष्ट्रीय शिक्षण उच्च शिक्षण नियंत्रण मंडळ' येईल असे त्या परिसंवादात म्हणाल्या.

अध्यक्षस्थानी ॲड. रवींद्र पाटील होते. सूत्रसंचालन श्यामकांत रुते यांनी केले. सचिव प्राध्यापक डॉक्टर सुनील पाटील, जळगाव यांनी आभार मानले.

### सर्वोदय संवाद सायकल यात्रेचे आगमन

धुळे ते पवनार व सेवाग्राम अशा सर्वोदय संवाद सायकल यात्रेचे जळगाव शहरात आगमन झाले असता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या जळगाव केंद्राच्यावतीने या यात्रेतील तरुणांचे स्वागत करण्यात आले व त्यांच्याशी संवाद साधण्यात आला.

महात्मा गांधींची १५१ वी जयंती, आचार्य विनोबा भावे

यांची १२५ वी जयंती आणि आगामी भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव हे निमित्त साधून धुळ्यातील काही तरुणांनी सर्वोदय संवाद सायकल यात्रा २७ ऑक्टोबर पासून सुरू केली. १५ नोव्हेंबरला ही सायकल यात्रा वर्धा येथील पवनार आश्रमात पोहोचली. यात्रेदरम्यान तरुणांच्या रोजगाराच्या पर्यायांचे प्रयोग, नवी राष्ट्रीय शिक्षण पद्धती व नियमांचे अवलोकन केले जाणार आहे.

या यात्रेचे जळगाव शहरात आगमन झाले असता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जळगाव केंद्राचे अध्यक्ष श्री. रवींद्र पाटील यांनी त्यांचे स्वागत केले व केंद्राच्यावतीने आर्थिक मदतही केली.

यावेळी या सायकल यात्रेचे आयोजन व सर्वोदयी कार्यकर्ते विनोद पवार तसेच सहभागी झालेले तरुण सृजन हरिहर, मयुर पाटील, रोहित देवरे, आकाश कोळी, विकास उफाडे, धीरज घोरपडे, अभिषेक हिरे, प्रशांत बावस्कर, प्रशांत डेंगे यांच्यासोबत शंभू पाटील व सुनील पाटील यांनी संवाद साधून शिक्षण, नाट्य, विविध विचारप्रवाह यांवर तासभर चर्चा केली. विद्या इंग्लिश स्कूल मेहरूण, जळगाव येथे हा कार्यक्रम झाला.

### सर्व कलांनी होते रंगभूमी समृद्ध

रंगभूमी ही सर्व कलांनी मिळून बनते, कला-साहित्य आंतर संबंधांचा शोध या परिसंवादात उमटला.

विद्या इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात रंगलेल्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी अभिनेत्री मंजुषा भिडे होत्या. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जळगाव केंद्राचे अध्यक्ष श्री. रवींद्र पाटील, परिवर्तनचे अध्यक्ष शंभू पाटील, गायिका सुदिप्ता सरकार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सदस्य अंजली पाटील, हर्ष पाटील, प्राध्यापक सत्यजित साळवे, डॉक्टर अपर्णा भट आदींची उपस्थिती होती. साळवे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राध्यापक संजय पत्की यांनी संगीत हा रंगभूमी सोबतच मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असून नाटकात संगीताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे असे सांगितले. डॉक्टर अपर्णा भट यांनी कथ्थक नृत्याच्या विविध गोष्टी सांगून नाटक रंगभूमीशी असलेला अनुबंध विषद केला. तसेच आकाश बाविस्कर या नाट्य कलावंताने लॉकडाऊनच्या काळातील नाट्यनिर्मितीविषयी सांगून साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकला या कलांचा संबंध मांडताना कलेतील मूल्य आणि आजच्या कलावंतांसमोरील प्रश्नांची गरजांची पूर्ती कशी करावी याची चर्चा केली. रवींद्र पाटील यांनी याप्रसंगी जीवनातील कलेचे महत्त्व विषद करून कला जगण्यासाठी कशी महत्त्वाची आहे, हे सांगितले. परिसंवादाचे सूत्रसंचालन हर्षल पाटील यांनी केले.

### मराठी रंगभूमी दिन साजरा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या जळगाव केंद्राच्यावतीने मराठी रंगभूमी दिनानिमित्त नटराज व रंगभूमीच्या पूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्राचे अध्यक्ष ॲडवोकेट रवींद्र पाटील, प्राचार्य एस एस राणे, श. दि. वडोदकर, विजय पाठक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य राणे यांनी समाजाचे सुखदुःख रंगभूमीद्वारे मांडले जाते, असे प्रतिपादन केले. वडोदकर यांनी जळगावमधील सर्व रंगकर्मींनी एकत्र येऊन यापुढे रंगभूमी दिन मोठ्या उत्साहात साजरे करण्याचे आवाहन केले. विजय पाठक यांनीही या भागात नाट्यचळवळ वाढावी, असे मत व्यक्त केले तर रवींद्र पाटील यांनी शासनाने प्रेक्षकांसाठी नाट्यगृहे पुन्हा खुली केली असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

हर्षल पाटील यांनी सूत्रसंचालन तर अंजली पाटील यांनी आभार मानले. यावेळी शंभू पाटील, ज्ञानेश मोरे, डॉक्टर सुनील पाटील, मंजुषा भिडे, पियूष रावळ, जगदीश नेवे, चिंतामण पाटील, शरद पांडे, होरोलसिंग राजपूत, राजेंद्र देशमुख, योगेश पाटील आदी उपस्थित होते

### यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे ऑनलाइन कवी संमेलन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या जळगाव केंद्राच्यावतीने २३ नोव्हेंबर २०२० रोजी ऑनलाईन कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनात अशोक सोनावणे, ज्ञानेश मोरे, अशोक जोशी, माया धुप्पड, योगिता पाटील सहभागी झाले होते. प्राध्यापक दीपक पवार यांनी सूत्रसंचालन केले. केंद्राचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. गुगल मीटद्वारा झालेल्या या संमेलनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्राचे पदाधिकारी डॉ. सुनील पाटील, निशा जैन, प्राध्यापक एन डी भट, डॉ. अंजली पाटील यांनी केले आहे. ❖

# विभागीय केंद्र, देवराष्ट्रे

**दि.१ ऑगस्ट २०२० ते ३१ जानेवारी २०२१**

**विशेष कार्यक्रम**

दि. १ ऑगस्ट २०२० ते ३१ जानेवारी २०२१ या कालावधीत यशवंतराव चव्हाण साहेबांच्या 'जन्मघर' स्मारकास एकूण ५९० पर्यटकांनी भेटी दिल्या. २५ नोव्हेंबर रोजी मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्व. आर. आर. पाटील (आबा) यांचे चिरंजीव श्री. रोहित पाटील (युवा नेते, राष्ट्रवादी काँग्रेस) होते.

'यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने देशभरात महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला. सुसंस्कृतपणा, विनम्रता हा त्यांचा मोठा गुण होता. माझ्या वाचनात यशवंतराव चव्हाण यांचे पहिले पुस्तक आले ते 'कृष्णाकाठ'. त्यानंतर त्यांची विविध पुस्तके वाचली. यशवंतराव देश विदेशात गेले तरी त्यांनी जन्मभूमीशी असलेली नाळ कधी तोडली नाही. या भागातील माती आणि माणसांवर प्रेम करीत राहिले, असे प्रतिपादन श्री.रोहित पाटील यांनी केले.

काँग्रेस पक्षाचे युवा नेते जितेश कदम यांनीदेखील जन्मघर स्मारकामध्ये उपस्थित राहून यशवंतरावांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.'चव्हाण साहेबांच्या विचाराने प्रभावित होऊन माझ्या सामाजिक कामाची सुरुवात झाली. यशवंतरावांचे साहित्य वाचल्यानंतर मी अधिक प्रभावित झालो. स्व.पतंगराव कदम साहेबांचे यशवंतरावांवर मोठे प्रेम होते. त्यांनी देवराष्ट्रेमध्ये यशवंतरावांचे स्मारक उभारले आहे. जन्मघराचे देखील उचित स्मारक व्हावे अशी त्यांची इच्छा होती,' असे उद्गार श्री.जितेश कदम यांनी काढले.

देवराष्ट्रे केंद्रामध्ये होणारे सर्व कार्यक्रम श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले जातात. ❖

# विभागीय केंद्र, रत्नागिरी

**भव्य रक्तदान मोहीम**

प्रतिष्ठानच्या कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष आमदार शेखर निकम यांच्या उपस्थितीत ही रक्तदान मोहीम आयोजित करण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी प्रवीण पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंता कैलास लवेकर, चिपळूण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. वैभव विधाते आदी उपस्थित होते.

राज्यात रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने शासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. निकम यांनी जिल्हा रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान मोहीम राबविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दिनांक २ जून २० रोजी सावर्डे येथे व दिनांक ११ जून २०२० रोजी चिपळूण येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरास ५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदात्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. ❖

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## युवा काव्यसंध्या

बी. रघुनाथ यांच्या कविता अर्थवैविध्य निर्माण करणाऱ्या आहेत. त्यांची कविता अस्सल मराठवाडी लेणं असलेली आहे, असे प्रतिपादन डॉ. कैलास अंभुरे यांनी केले. मराठवाड्याचे भूषण ज्येष्ठ कवी बी. रघुनाथ यांच्या स्मृतीदिनानिमित्त रविवारी (दि. ७) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व अभ्युदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा काव्यसंध्या' या ऑनलाईन कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. 'ज्येष्ठ कवी बी. रघुनाथ व त्यांची कविता,' या विषयावर डॉ. अंभुरे यांचे व्याख्यान झाले. ते पुढे म्हणाले, बी.रघुनाथ यांच्या कविता अर्थवैविध्य निर्माण करणाऱ्या आहेत. प्रेम, विरह, उदासीनता, आस, नावीन्याचा ध्यास असे विविध भाव त्यांच्या कवितेतून दिसतात. त्यांच्या कवितेतून स्त्रीची विविध रूपे प्रकट झाली आहेत. बी.रघुनाथांची कविता स्वानंदासाठी जन्माला आली आहे, त्यांचे साहित्य आजच्या काळातही महत्त्वाचे आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबादचे सल्लागार नंदकिशोर कागलीवाल यांनी कोरोनाच्या साथीमुळे संपूर्ण विश्वात पुन्हा एक वैचारिक क्रांती घडेल असा विश्वास व्यक्त केला. विकासाची नवी व्याख्या, जगण्याची नवी परिभाषा बदलेल. नवे विचार, नवी क्रांती उदयास येईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

काव्यसंध्येची सुरुवात धम्मपाल जाधव यांच्या 'प्रेमाचा वर्षा नवा, आला पाऊस, प्रीतीचा संगम नवा, आला पाऊस' या पाऊस कवितेने झाली. 'बात वतन की करते हो तुम' ही आजच्या परिस्थितीवर भाष्य करणारी कविता सादर करून त्यांनी उपस्थितांची वाहवा मिळविली. नीलेश चव्हाण यांनी मराठवाड्याविषयी आदर व्यक्त करणारी 'ओढत आहे वर्षानुवर्ष माणुसकीचा गाडा, पुण्यवंत अन भाग्यवंत अमुचा मराठवाडा' ही कविता सादर केली. त्यांच्या 'तुका' या कवितेनेही रंगत आणली.

भाग्यश्री वाघमारे यांनी त्यांची 'दिस जाई, सांज ढळे, दूर कुठे ऊर जळे' आणि 'व्यवस्थेला प्रश्न विचारायलाच हवेत' या कविता सादर करत दाद मिळविली. डॉ. स्वप्नील चौधरी यांनी 'झाडाला सजीव समजलं तर...' या कवितेतून झाडांचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. गणेश घुले यांच्या 'मी बरं लिहू लागल्यापासून' या कवितेने काव्यसंध्येत रंगत आणली. स्त्रियांवरील अत्याचाराचे दाहक वास्तव मांडणारी 'गावभर अंधार पडतो, ती रोज एक दिवा लावते' ही कविता त्यांनी सादर केली. गुंजन पाटील यांनी स्त्रियांवरील अत्याचारांना वाचा फोडणारी 'बोललंच पाहिजे' ही कविता सादर केली.

प्रतिष्ठानच्या औरंगाबाद केंद्राचे सचिव नीलेश राऊत म्हणाले की, औरंगाबाद केंद्रातर्फे गेल्या चार-पाच महिन्यात अनेक सामाजिक उपक्रम घेण्यात आले. परंतु साहित्यविषयक उपक्रम घेता आले नाहीत. आजच्या या काव्यसंध्येने या उपक्रमांना सुरुवात झाली आहे, पुढेही असे उपक्रम सुरू राहतील.

महेश अचिंतलवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, दीपक जाधव, श्रीकांत देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

## औरंगाबाद पर्यटन क्षेत्र- आव्हाने व बदललेले जग

कोरोना संकट, लॉकडाऊनचा मोठा परिणाम पर्यटन क्षेत्रावर झाला. या संकटातून बाहेर पडताना आंतरराष्ट्रीय पर्यटनावर विसंबून न राहता देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद, अमेझिंग औरंगाबाद ग्रुप व अभ्युदय फाउंडेशन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद पर्यटन क्षेत्र: आव्हाने व बदललेले जग या विषयावर विशेष ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन १३ सप्टेंबरला करण्यात आले होते. या परिसंवादात हरप्रितसिंग (अध्यक्ष, औरंगाबाद हॉटेल व रेस्टॉरंट असोसिएशन), सुनीत कोठारी (उद्योजक तसेच औरंगाबाद हवाई व पर्यटन क्षेत्रांचे तज्ज्ञ), जसवंतसिंग (अध्यक्ष, औरंगाबाद टुरिझम डेव्हलपमेंट फाउंडेशन), प्रा. बीना सेंगर (इतिहास विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) हे मान्यवर सहभागी झाले होते. कोरोना संकट, लॉकडाऊनमुळे पर्यटन क्षेत्रापुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. औरंगाबादच्या पर्यटन क्षेत्राविषयी बोलताना श्री. कोठारी म्हणाले की, पर्यटन क्षेत्राला आव्हाने

नवीन नाहीत. प्रत्येक आव्हानावर आम्ही मात केली आहे. त्यामुळे, कोरोना संकटातूनही पर्यटन क्षेत्र पूर्ण ताकदीनिशी बाहेर येईल याबाबत आम्ही आशावादी आहोत. आंतरराष्ट्रीय पर्यटन वर्षभरासाठी तरी बंदच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे या काळात देशांतर्गत पर्यटनाला चालना देणे गरजेचे आहे. त्यासाठी हवाई वाहतूक, रस्त्यांतर्गत वाहतून करताना प्रवाशांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक ती काळजी घ्यायला हवी. हॉटेलमध्येही सुरक्षिततेसंदर्भात योग्य ती काळजी घेतली जात आहे. पण, पर्यटकांना आपल्या सुरक्षिततेची हमी मिळावी यासाठी या सर्व सोयी सुविधांचा प्रचार, प्रसार होणे गरजेचे आहे. त्यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर प्रभावीपणे केला जावा. आंतरजिल्हा पर्यटन, आंतरराज्य पर्यटनाला चालना मिळायला हवी. दुर्लक्षित अशा चांगल्या पर्यटनस्थळांना उजेडात आणण्याची ही उत्तम संधी आहे. या पर्यटनस्थळांच्या प्रचार, प्रसारासाठी सोशल मीडियाचा वापर करायला व्हावा. पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या योजनांचा विचार करायला हवा. हेरिटेज वॉक, कृषी पर्यटन, फोटोग्राफी, टुरिजम क्विजेस अशा माध्यमांतून पर्यटकांना आकर्षित केले जाऊ शकते.

जसवंत सिंग म्हणाले की, पर्यटन क्षेत्राला कोरोना संकटातून बाहेर येण्यासाठी आणखी एक वर्ष लागण्याची शक्यता आहे. औरंगाबादमध्ये अंजिठा, वेरूळ ही आंतरराष्ट्रीय ख्यातीची पर्यटनस्थळे आहेत. यासोबतच शहरात आणि जिल्ह्यात असलेल्या अनेक पर्यटनस्थळांचाही प्रचार, प्रसार होणे, पर्यटन क्षेत्र वाढण्यासाठी शासन, प्रशासन, संबंधित संस्था, संघटनांच्या माध्यमातून एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचे ते म्हणाले.

हॉटेल उद्योगाबाबत बोलताना हरप्रितसिंग म्हणाले, मागील पाच ते सहा महिने हॉटेल व्यवसाय बंद राहिला आहे. अद्याप हॉटेल सुरू झालेली नाहीत. या व्यवसायात भांडवलाची मोठी गुंतवणूक होते. त्यामुळे लॉकडाऊनचा मोठा फटका या व्यवसायाला बसला आहे. पुन्हा नव्याने सुरुवात करणे हीसुद्धा खर्चिक बाब असणार आहे. हॉटेल बंद असताना कर माफ करण्याची विनंती आम्ही शासनाला केली आहे. अद्याप याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. या व्यवसायाशी संबंधित अनेक उद्योग सध्या ठप्प झाले आहेत. तर अनेक उद्योग बंद झाले आहेत. या आव्हानात्मक परिस्थितीतूनही बाहेर पडू, याबाबत मी आशावादी आहे. औरंगाबादला पर्यटनाची राजधानी म्हटले जाते. पण तशा प्रकारच्या सोयी सुविधा येथे उपलब्ध झाल्या, तर त्याचा नक्कीच फायदा होईल.

प्रा. बिना सेंगर म्हणाल्या, औरंगाबादकडे पर्यटक आकर्षित व्हावा यासाठी संशोधनात्मक कार्यक्रमांची गरज आहे.

परिसंवादाचे प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे सचिव नीलेश राऊत यांनी केले. पत्रकार संकेत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुबोध जाधव, निखिल भालेराव, अॅड. स्वप्नील जोशी, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे, दीपक जाधव यांनी परिश्रम घेतले.

## यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष व्याख्यान

नितीशकुमार हे बिहारचे मुख्यमंत्री झाले असले, तरी तेथील मुख्य लाभार्थी भाजपच आहे. लॉकडाउनच्या काळात आर्थिक स्थिती, मजुरांची हेळसांड यासारख्या विपरीत परिस्थितीत असतानाही लोकांनी भाजपला मत देणे ही पक्षासाठी आत्मविश्वास वाढवणारी बाब आहे. मात्र, भाजपने बिहारमध्ये नरेंद्र मोदींना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असल्यासारखे पुढे केले. त्यामुळे, नितीशकुमारांना नव्हे तर मोदींनाच जिंकून दिल्यासारखे हे चित्र बनले. दुसरीकडे, दिशादर्शक आश्वासने देण्याच्या बाबतीत मात्र नितीशकुमार किंवा मोदींच्या तुलनेत तेजस्वी यादव यांनीच बाजी मारली. एका अर्थाने तेजस्वी 'मॅन ऑफ द मॅच' ठरले आहेत, असे मत राजकीय विश्लेषक भाऊसाहेब आजबे यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय यांच्यावतीने 'बिहार निवडणुकीचा अन्वयार्थ' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम होते. एमजीएमचे विश्वस्त प्रतापराव बोराडे, उद्योजक सुनील किर्दक, डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. आजबे पुढे म्हणाले, एमआयएमने जिंकलेल्या ५ जागा केवळ १५ दिवसांच्या प्रचारामुळे नव्हे, तर त्यांनी पुरावेळी केलेल्या कामामुळे जिंकल्या आहेत. या विजयाचा त्यांना पश्चिम बंगालच्या निवडणुकीत लाभ होऊ शकतो. मात्र, एमआयएमचा विजय चिंतेचा विषय असून सेक्युलर पक्षांपुढील आव्हान आहे.

एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, जयदेव डोळे, प्रवीण बर्दापूरकर, निरंजन टकले, प्रा. एच.एम. देसरडा, सुबोध जाधव, रेणुका कड, निखील भालेराव, आशा देशपांडे

यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक सुहास तेंडुलकर यांनी केले. सूत्रसंचालन महेश अचिंतलवार यांनी तर आभार शिव कदम यांनी मानले. नॅशनल जिओग्राफीकडून 'आऊटस्टँडिंग फोटोग्राफर' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल छायाचित्रकार बैजू पाटील यांचा प्रतिष्ठानच्यावतीने अंकुशराव कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

❖❖❖❖❖❖❖

## चित्रपट चावडी

### 'द मेकिंग ऑफ द महात्मा'

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय संचलित एमजीएम फिल्म आर्ट्स विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट चावडी उपक्रमाअंतर्गत दि. ३० जानेवारी २०२१ रोजी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'द मेकिंग ऑफ द महात्मा' हा चित्रपट चित्रपती व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम फिल्म आर्ट विभाग, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला. कोरोना काळानंतर 'चित्रपट चावडी'चा हा पहिलाच उपक्रम होता.

'मेकिंग ऑफ द महात्मा' हा चित्रपट १९९६ मधील भारत-दक्षिण आफ्रिका संयुक्त निर्मिती असून, श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेला आहे. महात्मा गांधी यांच्या दक्षिण आफ्रिकेतील सुरुवातीच्या काळातील जीवनावर आधारलेला हा चित्रपट आहे. फातिमा मीर यांनी चित्रपटाची पटकथा लिहिलेली आहे. त्यांच्या 'द अँप्रेंटिसशिप ऑफ ए महात्मा' या पुस्तकावर आधारित हा चित्रपट आहे. चित्रपटाला इंग्रजीतील सर्वोत्कृष्ट फिचर फिल्मचा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. चित्रपटात राजीत कपूर, पल्लवी जोशी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. राजीत कपूर यांना या चित्रपटातील भूमिकेकरिता सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने गौरविलेले आहे.

चित्रपटास ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव, प्रतीक राऊत, निखिल भालेराव, महेश हरबक आदींची उपस्थिती होती. ❖

❖❖❖❖❖❖❖

# विभागीय केंद्र, नागपूर

## स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३५ वी पुण्यतिथी

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त 'साहित्यिक यशवंतराव चव्हाण' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बुधवार दि. २७ नोव्हेंबर, २०२० रोजी प्रेस क्लब, सिव्हील गार्डन्स, नागपूर येथील सभागृहात संपन्न झाला. याप्रसंगी २०२० चा 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' उर्दू, मराठी व हिंदी साहित्याचे प्रसिद्ध अनुवादक डॉ. मोहम्मद असदुल्लाह यांना प्रदान करण्यात आला.

काव्यशास्त्राचे अभ्यासक व ज्येष्ठ चित्रकार श्री. गणेश कनाटे व ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. श्रीकांत तिडके हे प्रमुख वक्ते म्हणून याप्रसंगी उपस्थित हेते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

❖❖❖❖❖❖❖

## बाबुराव वैद्य यांना श्रद्धांजली

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व प्रेस क्लबच्या संयुक्तवतीने दि.२८ डिसेंबर, २०२० रोजी प्रेस क्लब, सिव्हील गार्डन्स, नागपूर येथे ज्येष्ठ संपादक व विचारवंत स्व. मा. गो. वैद्य उपाख्य बाबुराव वैद्य यांच्या श्रद्धांजलीचा कार्यकम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी सर्वश्री लक्ष्मणराव जोशी, मेघनाद बोधनकर, गेव्ह आवारी, देवेंद्र गावंडे व श्रीपाद अपराजित हे वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रदीप मैत्रेय हे अध्यक्षस्थानी होते.

❖❖❖❖❖❖❖

# विभागीय केंद्र, पुणे

**ग्राहक संरक्षण**

डिसेंबर १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा अंमलात आला. तेव्हापासून ग्राहक सहकारी संस्था/ असोसिएशन, तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था, त्यांचे फेडरेशन्स यांना व अन्यांना आपल्या सभासदांवर ग्राहक म्हणून झालेल्या अन्यायाविरुद्ध ग्राहक न्यायालयातही दाद मागण्याची मुभा/ व्यवस्था होती. परंतु राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण कमिशनच्या 'प्रत्येक ग्राहकाला स्वतंत्रपणे न्यायासाठी, ग्राहक न्यायालयात अर्ज करावा लागेल,' या निर्णयामुळे अडचणी उत्पन्न झाल्या. त्याच्या निवारणार्थ, सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. त्यामध्ये, ग्राहक संरक्षण कायद्यातील फक्त स्वेच्छिक (Voluntary) असोसिएशनलाच ग्राहक संरक्षण कायद्याखाली दाद मागता येईल. पण जी असोसिएशन, स्टॅच्युटरी कायद्याखाली निर्माण झाली आहेत, उदा. सहकारी संस्था कायद्यांखाली, ग्राहक सहकारी संस्था/ संघ, गृहनिर्माण सहकारी संस्था असोसिएशन्स/ फेडरेशन्स इत्यादी संस्था स्वेच्छिक असोसिएशन्स नसल्याने त्यांना ग्राहक संरक्षण कायद्याचा लाभ नाकारण्यात आला. हे अध्यक्ष, ग्राहक पंचायत मुंबई यांच्या लेखावरून लक्षात घेता त्याबाबत व्यासपीठाच्या एका विचार मंथन (Think Tank) सभेत निवडक जाणकार अधिकारी व सामाजिक भान; याला महत्त्व देणाऱ्या जाणकार वकील इत्यादी यांच्याशी चर्चा करून केंद्र शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला.

त्याच्या जोडीने राज्य शासनानेही सदर प्रस्तावास दुजोरा देऊन त्यांच्याकडूनही या प्रस्तावाचा म्हणजेच ग्राहक संरक्षण कायद्यात ज्या ज्या ठिकाणी 'व्हॉलंटरी असोसिएशन' असा उल्लेख आहे, त्या त्या ठिकाणी (Voluntary) हा शब्द गाळण्याचा प्रस्ताव (उदा. सदर कायदा कलम २(५)(II) व प्रोव्हीजन कलम ३५); ही दुरुस्ती व्हावी हा प्रस्ताव श्री. अनिल कवडे (सहकार आयुक्त) यांना दि.२८ ऑगस्ट २०२० रोजी श्री.अंकुशराव काकडे यांच्या सहीने पाठवला. सहकारी संस्थांच्या हितार्थ या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली. अध्यक्ष, ग्राहक पंचायत, मुंबई यांच्याकडेही चौकशी केली असता ते करीत असलेल्या प्रयत्नांस केंद्र शासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे समजते. अशा प्रकारे सहकारी संस्था सभासद व त्यांच्या असोसिएशनला येऊ घातलेल्या/ येणाऱ्या ग्राहक संरक्षण अडचणी दूर होतील अशी आशा आहे.

(अ) कॉम्पीटंट ऑथोरिटी म्हणून सहकार आयुक्तांच्या अधिकारांचे, तालुकास्तरापर्यंत डेलीगेशन

(ब) गृहनिर्माण सहकारी संस्थांना त्या ज्या जागी त्या विराजमान आहेत त्या जागांचे मानीव हस्तांतरण (Deemed Conveyance) होणे व त्या गृहनिर्माण संस्थांच्या (Redevelopment) स्वयंविकासास चालना या दोन्ही बाबी मार्गी लागल्या आहेत. तसेच

(क) सहकारी गृहनिर्माण संस्था की ज्यांची सभासद संख्या २५० पर्यंत आहे, त्यांच्या निवडणुकांची पद्धत सोपी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण त्यामध्ये लोकशाही व्यवस्थापन या सहकारी तत्वांची मा. शरद पवार यांच्या खास प्रयत्नाने, भारतीय घटनेतील ९७ वी दुरुस्ती व वस्तुस्थिती याचा विचार होऊन सुवर्णमध्ये म्हणजे बहुतेक अशा संस्थांचे १०० पर्यंत सभासद संख्या निवडणुका, त्यांनीच शासन यादीतून ३ पैकी एक निवडणूक अधिकाऱ्यामार्फत शासनाच्या आदेशाने व्हाव्यात असे सुचवावेसे वाटते.

निबंधक सहकारी संस्था यांच्या अधिकाराचे (डेलिगेशन) शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ७१ भाग आठ दिनांक १५ सप्टेंबर २०२० नुसार महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट १९७० मध्ये जरूर ती दुरुस्ती करून

१) त्यामध्ये सहकारी न्यायालयांना सदर कायद्याबाबतही न्यायदानात स्थान स्थापित केले. त्यानुसार कॉम्पिटंट ऑथोरिटीचे निकालानंतर महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅटस् ॲक्टप्रमाणे हायकोर्टात थेट जाणे; जे सर्वसामान्यांना अशक्य असते ते टळून योग्य जिल्ह्यातच न्याय मिळण्याची सोय झाली./ कॉम्पिटंट ऑथोरिटीचे अधिकार राज्यस्तरावरच अडकवून न ठेवता त्याचे डेलिगेशन सहकारी विभागाचे तालुकास्तरावरील राजपत्रित अधिकाऱ्यांपर्यंत करण्यात आले, जेणेकरून अपार्टमेंट ओनर्सच्या समस्यांना तालुकास्तरावरच न्याय मिळण्याची सुविधा प्राप्त झाली. अपार्टमेंट कायदा मोडणाऱ्यांविरुद्ध दाद मागण्याची व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत आपल्या तक्रार निवारणाची व्यवस्था अपार्टमेंटधारकांना उपलब्ध झाली.

या दुरुस्तीप्रमाणे कॉम्पिटंट ऑथोरिटीचे आदेशही धाब्यावर बसवणाऱ्या प्रवर्तक/ विकसक/ मालकांना थेट त्यांच्या त्यांच्या गुन्ह्यांनुसार तेवढीच सुयोग्य शिक्षेची तरतूद, जी अन्य दोन म्हणजेच सहकारी संस्था कायदा व कंपनी कायदा यांत आहे तशी ती नाही. त्याऐवजी सुव्यापसण्यम् न्यायाने मोफा कायद्याचा आधार अन्य अधिकाऱ्याचे मर्जीनुसार तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना घ्यावा लागेल. तेही जेवढ्यास तेवढीच शिक्षा या न्यायानुसार होणारे दिसत नाही. प्रतिष्ठानने याबाबत शासनास एक प्रस्ताव मा. सचिव कायदा व न्याय यांना अंकुशरावांच्या सहीने दिनांक ०२/०२/२०२१ रोजी सादर केला आहे. त्यात जसे सहकारी गृहनिर्माण संस्था, सभासद, तसेच हौसिंग कंपन्या व त्यांचे सभासद यांमधील विवाद, तक्रारी सोडविण्यासाठी व जरूर त्याठिकाणी शिक्षेची तरतूद आहे तशीच अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन्स, विकसक, मालक, प्रवर्तक आणि सभासद यांच्यामधील एकमेकांमधील तक्रारी वाद यांच्या निवारणार्थ आणि कॉम्पिटंट अधिकाऱ्यांच्या आदेशाच्या पालनार्थ कायद्याच्या आधाराचा बडगा हवाच. त्याचा समावेश अपार्टमेंट कायद्यात करण्यास सुचविले आहे.

त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्तांना दि.११.०१.2020 रोजी पत्र लिहून अपार्टमेंट दुरुस्ती कायदा २०२० चे अंमलबजावणीबाबत सहकारी अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शनार्थ म्हणून काही बाबी सुचविल्याही आहेत.

डीम्ड कन्व्हेअन्स (सहकारी गृहनिर्माण संस्था) हा प्रश्न अनेक वर्षे रेंगाळलेला दिसतो. कारण प्रश्न निवारणार्थ उचललेली पाऊले पुढील वाटचालीस उपयुक्त ठरली नाहीत.

आता जून २०१८ मध्ये झालेले निर्णय त्यावेळच्या सहकार विभागामध्ये लाल फितीत अडकवून बस्त्यांत बांधून ठेवलेला होता. त्याळा नवीन सहकार आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यावर काही प्रमाणात प्रतिष्ठानचे रेट्यामुळेही हे असू शकेल; पण प्रामुख्याने सहकारी चळवळीच्या वृद्धीसाठी जोराने स्वतः लक्ष घालून मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रतिष्ठाननेही याबाबतीत, कृषी व सहकार व्यासपीठाचे दि.२०/०१/२०२१ चे सभेत चर्चा करून त्यांना सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे.

प्रामुख्याने केंद्र शासनाचा रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट २०१६ आल्यानंतर ज्या प्रमाणे, फ्लॅट/ अपार्टमेंटची खरेदी-विक्री या व्यवहारांत सुसूत्रता येऊन खरेदी होताच; इंडेक्स दोन व मालमत्ता पत्रक खरेदीदाराचे हातात पडण्याची व्यवस्था झाली आहे. त्याच धर्तीवर व त्याच तत्त्वांचे अनुकरण प्रामुख्याने करून, वेगवेगळ्या कायद्याचे जंजाळात/ चक्रव्यूहांत ज्या खरेदीदारांना कायदा रेरा २०१६, येण्यापूर्वी अडकवून त्यांचे मौलिक मालकी हक्क, अर्थशक्ती व गुंडशक्ती याच्या जोरावर वंचित ठेवण्यात आले आहेत. त्यांना कशाप्रकारे २०१६ नंतरच्या खरेदीदारांना न्यायाच्या नव्या व्यवस्थेने मालकी हक्क देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे जुन्या गृहनिर्माण संस्था/ अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन्स/ हौसिंग कंपनीज याचे सभासदांचे मालकी हक्क विनाअडचणी सोडविता याव्यात यासाठी दि.११/०१/२०२१ रोजी न्याय तत्वावर आधारित सोपी व सुटसुटीत यंत्रणा मा. निबंधक सह. संस्था यांना सुचविण्यात आली आहे. त्यावर निर्णय घेण्याच्यावेळी त्या सूचनांचा आवश्यक विचार केला जाईल असे अतिरिक्त निबंधक सह. संस्था (गृहनिर्माण) यांनी सांगितले आहे.

## ग्रंथ वितरण व व्याख्यान

बालकुमार साहित्य संस्थेच्यावतीने महाराष्ट्र राष्ट्रभाषा समिती यांचे विद्यमाने, हरीभक्त परायण डॉ. रामचंद्र देखणे यांनी आपल्या व्याख्यानात कै. साने गुरुजींच्या आठवणी कथन केल्या. त्यावेळी निवडक गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ. दिलीप मानसिंग गरूड, माजी प्राचार्य यांनी प्रतिष्ठानने सुचविल्याप्रमाणे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मुलांना वाचनीय व अनुकरणात्मक चरित्र लिहिले. ते डॉ.गरूडांचे प्रकाशनामार्फत प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकांच्या १०० प्रती भिडे परिवार यांनी विकत घेऊन विद्यार्थी शाळा यांना वाटून त्यावर प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्याचे योजिले होते. पण ते कोरोनामुळे शक्य झाले नाही. पण त्यापैकी १५ प्रती प्रतिष्ठानने १५ निवडक गुणवंत विद्यार्थ्यांना दिनांक २४ डिसेंबर २०२० रोजी डॉ. रामचंद्र देखणे यांचे हस्ते वितरित केल्या. त्याशिवाय प्रख्यात साहित्यिक शिक्षण तज्ञ डॉ. त. म. जोशी यांचे कै. यशवंतराव चव्हाण चरित्रही सदर विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. प्रतिष्ठानचा बॅनरही त्या कार्यक्रमात लावण्यात आला. ❖

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

**ऑक्टोबर २०२०**

**'बीड जिल्हा माझ्या मोबाईल कॅमेरातून' छायाचित्र स्पर्धा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र अंबाजोगाई यांच्यावतीने 'बीड जिल्हा माझ्या मोबाईल कॅमेरातून' या स्पर्धेचे बक्षिस वितरण करण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील वैविध्यपूर्ण निसर्गाच्या मोबाईल कॅमेरातून टिपलेल्या फोटोची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला.

**स्पर्धेचा अंतिम निकालः**

**प्रथमः** ज्योतीराम कांदे, लाडझरी, ता. परळी (छायाचित्रः घाटनांदूर ते दौंडवाडी रोड आनंदवाडी गावाजवळ)

**द्वितीयः** अक्षय शेळके, देवळा ता. अंबाजोगाई (छायाचित्रः मांजरा बंधारा, विश्वरूपी देवीचे मंदिर, देवळा ता. अंबाजोगाई)

**तृतीय (संयुक्त):** स्वप्नील ओव्हाळ, अंबाजोगाई (छायाचित्रः मुकुंदराज परिसर, अंबाजोगाई) व मंगेश फड, मांडवा ता. परळी (छायाचित्र ठिकाणः केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी ता. परळी)

**'उल्लेखनीय'** पुरस्कारासाठी पात्र ठरलेले छायाचित्रकारः

१. रंगनाथ गाडेकर, कानडी बदन, ता. केज
२. अमीर शेख, मियाभाई कॉलनी, अंबाजोगाई
३. अक्षय धपाटे, बीड
४. ओंकार महाजन, धारूर
५. बालाप्रसाद चव्हाण, माजलगाव
६. संतोष कदम, अंबाजोगाई
७. पवन शिंदे, अंबाजोगाई.
८. श्रीकांत राऊत, अंबाजोगाई
९. गणेश वारद, अंबाजोगाई.
१०. श्रेयस दाभेकर

बक्षिस वितरण कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, केंद्र- अंबाजोगाई उपाध्यक्ष दगडू लोमटे, सचिव नरेंद्र काळे, मुन्ना सोमाणी, विजय लोंखडे, प्रा. प्रशांत जगताप, आदी उपस्थित होते.

# माजी केंद्रीय मंत्री दिवंगत अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दी निमित्त विशेष कार्यक्रम संपन्न

प्रतिष्ठानच्यावतीने माजी केंद्रीय मंत्री दिवंगत अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा व खासदार सुप्रियाताई सुळे यांनी अण्णासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप. शुगर फॅक्टरीजचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगांवकर यांनी महाराष्ट्रातील शेतीविषयी विचार मांडले. बाळासाहेब थोरात यांनी 'अण्णासाहेब शिंदे व भारतीय शेती,' या विषयावर आपले मत व्यक्त केले. गोकुळ पटनाईक यांनी 'भारतीय शेती' विषयक मार्गदर्शन केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने संपूर्ण वर्षात विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. मा. श्री. शरद पवार यांच्या उपस्थितीत या संकल्पनेची सुरुवात करण्यात आली.

'केंद्रात अनेक वर्षे शेती विभागाचे राज्यमंत्री म्हणून अण्णासाहेब शिंदे यांनी आपल्या कर्तृत्वाचा व दृष्टीचा ठसा उमटवला. संशोधनाच्या क्षेत्रावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केलं व या क्षेत्रातल्या मान्यवरांना त्यात सहभागी करून घेतलं. देशामध्ये हरितक्रांती आणण्यात ज्या लोकांचं योगदान होतं त्यात बाबू जगजीवनराम, सी. सुब्रमण्यम यांच्या जोडीने अण्णासाहेब शिंदेंचा उल्लेखही आवर्जून करावा लागेल. हरितक्रांती प्रत्यक्षात आणण्याच्या उपक्रमात अखंडता आणि सातत्य अण्णासाहेबांमुळेच शक्य झालं,' असे श्री. शरद पवार म्हणाले. ❖

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
|---|---|---|
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्त्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |
| २४ | २०१८ | डॉ. रघुराम राजन |
| २५ | २०१९ | डॉ. अभिजीत बॅनर्जी |
| २६ | २०२० | श्री. विवेक सावंत |

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रूपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषी औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |
| २०१८ | विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१९ | प्रा. एन. डी. पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास पारितोषिक |
| २०२० | लोकहितवादी मंडळ | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ - संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग २ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन : दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन - डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी' - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

| | | |
|---|---|---|
| २९. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३०. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३२. | शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३३. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३४. | वाटचाल ई-शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३६. | विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३७. | पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३८. | पर्व-प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, उर्दूतही उपलब्ध) | खासगी वितरणासाठी |
| ३९. | Whats App चर्चा– शिक्षण विकासाच्या – संपादक : माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००.०० |
| ४०. | सेमी इंग्रजी – का आणि कसे ? | २००.०० |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकाठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ - http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य - http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य - http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश - http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य - http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन - http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





**विभागीय केंद्र उस्मानाबाद:** मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रम प्रसंगी तुळजाभवानी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, सचिव बालाजी तांबे, कोषाध्यक्ष टेकाळे, सदस्य भा. न. शेळके, जगदाळे, तबस्सुम सय्यद, प्रा. डॉ. शिवाजीराव गायकवाड, प्रतिष्ठानचे पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



उस्मानाबाद येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये खासदार शरद पवार साहेबांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानाच्यावतीने व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यावेळी अध्यक्षस्थानी जीवनराव गोरे, प्रमुख पाहुणे धनंजय पाटील उपस्थित होते.




शिक्षण विकास मंच, महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण सचिव वंदना कृष्णा यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रात कशी करता येईल, यांच्या शिफारशीचे निवेदन सादर करताना माननीय सुप्रिया ताई आणि शिक्षण विकास टीम



शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित वेबिनार शिक्षणकट्टा: 'वर्गाध्यापन ते ONLINE अध्यापन'






**विभागीय केंद्र नांदेड:** विभागीय केंद्र नांदेडच्यावतीने आदरणीय यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले.



नवी मुंबई केंद्रातर्फे ज्येष्ठ नागरिक संघ, नेरुळ यांना सन २०२१ चा 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' दि. १४ नोव्हेंबर २०२० रोजी समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी रु १५ हजार रोख व मानपत्र प्रदान करताना केंद्राचे अध्यक्ष श्री. प्रमोद कर्नाड, सचिव डॉ. अशोक पाटील, ज्येष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष श्री. अरविंद वाळवेकर, नवी मुंबई महानगर पालिका सभागृह नेता श्री. रवींद्र इथापे व अन्य पदाधिकारी



**विभागीय केंद्र ठाणे:** दि.१७ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या 'विचारकुंकू' या अभिनव कार्यक्रमातील काही निवडक क्षण. डॉ. निर्मोही फडके व सौ. वासंती वर्तक यांच्यासोबत सत्कारमूर्ती व पदाधिकारी






**विभागीय केंद्र नागपूर:** यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' प्रदान समारंभाप्रसंगी डॉ. मोहम्म्द असदुल्लाह यांना पुरस्कार प्रदान करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीष गांधी, व्यासपीठावर उपस्थित डावीकडून श्री. समीर सराफ, डॉ. श्रीकांत तिडके, श्री. गणेश कनाटे व श्री. प्रेम लुनावत



**विभागीय केंद्र नागपूर:** स्व. मा. गो. वैद्य उपाख्य बाबुराव वैद्य यांना श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सर्वश्री मेघनाद बोधनकर. व्यासपीठावर डावीकडून डॉ. गिरीष गांधी, लक्ष्मणराव जोशी, गेव्ह आवारी, देवेंद्र गावडे आणि श्रीपाद अपराजित



**विभागीय केंद्र कराड:** यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र कराड 'विरंगुळा' येथे यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.



यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त, 'प्रीतीसंगम' या समाधीस्थळी पुष्पचक्र अर्पण करून स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांना आदरांजली वाहिली.



नॅशनल जिओग्राफीकडून 'आऊटस्टँडिंग फोटोग्राफर' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल छायाचित्रकार बैजू पाटील यांचा विभागीय केंद्र औरंगाबादच्यावतीने श्री. अंकुशराव कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**विभागीय केंद्र कराड:** यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त, 'प्रीतीसंगम' या समाधी स्थळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांनी पुष्पचक अर्पण केले. यावेळी विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष तसेच सहकारी व मंत्री नामदार बाळासाहेब पाटील, गृहराज्यमंत्री श्री. सतेज पाटील, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण, खासदार श्री.श्रीनिवासजी पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.



**विभागीय केंद्र औरंगाबाद:** यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय यांच्यावतीने 'बिहार निवडणुकीचा अन्वयार्थ' या विषयावरील विशेष व्याख्यानात बोलताना श्री. भाऊसाहेब आजबे.



आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र औरंगाबादच्यावतीने यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी उपस्थित (डावीकडून) सर्वश्री गणेश गुले, उदय भोसले, दीपक जाधव, श्रीराम पोतदार, सुबोध जाधव, मयुर देशपांडे, किशोर नरवडे आदी.



**विभागीय केंद्र अहमदनगर:** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगर व यशवंत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ ऑगस्ट २०२० रोजी सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते झाडांचा वाढदिवस साजरा करून नवीन ५०१ देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत, मोरया चिंचोरे, ता. नेवासा येथील महात्मा गांधींच्या पुतळ्यास पुष्पहार घालून महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे भेंडा येथील डॉ.ईश्वर उगले, श्री. बाळासाहेब लिंगायत व ग्रामस्थ उपस्थित होते.



**विभागीय केंद्र आंबाजोगाई** आयोजित फोटोग्राफी स्पर्धा: 'बीड जिल्हा माझ्या मोबाईलच्या कॅमेरातून' या स्पर्धेचे पारितोषिक वितरण








**विभागीय केंद्र नाशिक:** वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तके भेट देताना सर्वश्री विश्वास ठाकूर, विनायक रानडे, प्रसाद पाटील, विकास सुराणा, विशाल वाणी, मुख्याध्यापिका कुंदा बच्छाव तसेच विद्यार्थिनी शीतल ठाकरे, राणी रणबावळे, स्वाती राजगुरू, सोनाली साह आदी



**विभागीय केंद्र देवराष्ट्रे,** काँग्रेस पक्षाचे युवा नेते जितेश कदम आणि श्री.रोहित पाटील यांच्या हस्ते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करताना.






MAKE YOUR FUTURE BRIGHT
MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology
KLiC
Tally
Power of Simplicity
TALLY
KLiC
GRAPHICS
KLiC
WEB DESIGNING
KLiC
C/C++
Programming
C PROGRAMMING
KLiC
English
ENGLISH SPEAKING
YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN
( YCP )
MKCL
KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
5th Floor, Y.B. Chavan Centre, Gen. J.Bhosale Marg,
Opp.Mantralaya,Namriman Point, Mumbai-400 021.
Tel. No: 22817975 / 22043617 / 19 /
Mobile No. 9769256343

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, अपंग हक्क विकास मंच

## ठाकरसी ग्रुप मुंबई। पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट

महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र पुणे, जगदंब प्रतिष्ठान महाराष्ट्र

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दिवस चौथा

दि. १२ डिसेंबर २०२०

## मोफत श्रवणयंत्र वितरण कार्यक्रम

# क्षणचित्रे







स्थळ : राजमाता जिजाऊ महाविद्यालय, भोसरी, पुणे. | दिनांक : ९ ते १३ डिसेंबर २०२०